# प्रकरण चौथे

## संकलित माहितीचे पृथःकरण व विशदीकरण

# प्रकरण चौथे

## संकलित माहितीचे पृथःकरण व विशदीकरण.

प्रस्तुत प्रकरणात मुक्त विद्यापीठाच्या बी. एड्. शिक्षणक्रमातील असणारा अभ्यासक्रम, तो पूर्ण करण्यासाठी असणारा कालखंड, विद्यापीठाकडून पुरविलेल्या संदर्भसहित पुस्तिका, अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिके, अभ्यासक्रम पूर्ण करताना येणा-या अडचणी, अडचणीवरील उपाययोजना इत्यादी संदर्भात प्रतिसाद मिळालेल्या माहितीचे पृथःकरण व विशदीकरण पुढील विभागात केले आहे.

1. प्रशिक्षणार्थीकडून प्रश्नावलीद्वारा मिळालेल्या माहितीचे पृथःकरण व विशदीकरण.

2. प्राध्यापकांकडून प्रश्नावलीद्वारा मिळविलेल्या माहितीचे पृथःकरण व विशदीकरण.

3. मुलाखतीद्वारे केंद्रसंचालक, समन्वयक व प्रशिक्षणार्थीकडून मिळविलेल्या माहितीचे पृथःकरण व विशदीकरण.

### 4.1. प्रशिक्षणार्थीकडून मिळविलेल्या माहितीचे पृथःकरण व विशदीकरण.

## शैक्षणिक पात्रता :

शिक्षकांच्या अध्यापनाची गुणवत्ता ही त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर अवलंबून असते. शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेचे विश्लेषण कोष्टक 2 मध्ये केलेले आहे.

कोष्टक 2

प्रशिक्षणार्थींची शैक्षणिक पात्रता

| अ.नं. | शैक्षणिक पात्रता | प्रतिसादक संख्या | | प्रतिशत प्रमाण. | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री | पुरूष | स्त्री | पुरूष |
| . | बी. ए. | 6 | 6 | 11.76 | 11.76 |
| 2. | बी. एस्सी. | 1 | 2 | 1.96 | 3.92 |
| 3. | बी. ए. डी. एड्. | 3 | 9 | 5.88 | 17.54 |
| 4. | एम्. ए. डी. एड्. | 12 | 12 | 23.52 | 23.52 |
| | | 22 | 29 | 43.12 | 56.80 |

बी. ए. झालेल्या स्त्री विद्यार्थी शिक्षकांचे प्रमाण 11.76 प्रतिशत तर पुरूष शिक्षकांचे प्रमाण 11.76 प्रतिशत आहे. बी. एस्सी. झालेल्या स्त्री शिक्षकांचे प्रमाण 1.96 प्रतिशत तर पुरूष शिक्षकांचे प्रमाग 3.92 प्रतिशत इतके आहे. बी. ए., डी. एड्. झालेल्या पुरूष विद्यार्थी शिक्षकांचे प्रमाण 17.54 प्रतिशत तर स्त्री विद्यार्थी शिक्षक 5.88 प्रतिशत इतके आहेत. एम्. ए., डी. एड्. झालेल्या स्त्री व पुरूष विद्यार्थी शिक्षकांचे प्रमाण समान म्हणजे 23.52 प्रतिशत प्रत्येकी आहे.

अध्यापन अनुभव :

अध्यापन अनुभवामुळे अध्यापनात अधिक सखोलता येते. कोष्टक 3 वरून अध्यापन अनुभव दिसून येतो.

कोष्टक 3

विद्यार्थ्यांचा अध्यापन अनुभव

| अ.नं. | वर्षे | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1. | एक ते पाच वर्षे | - | - |
| 2. | सहा ते दहा वर्षे | 15 | 29.41 |
| 3. | अकरा ते पंधरा वर्षे | 21 | 41.17 |
| 4. | सोळा ते वीस वर्षे | 9 | 17.64 |
| 5. | वीस वर्षापेक्षा जास्त | 3 | 5.88 |
| 6. | उत्तर नाही. | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

प्रशिक्षणार्थींमध्ये सहा ते दहा वर्षे अध्यापन अनुभव असलेले विद्यार्थी शिक्षक प्रतिशत 29.41 तर अकरा ते पंधरा वर्षे अध्यापन अनुभव असलेले विद्यार्थी शिक्षक प्रतिशत 41.17 इतके आहेत. सोळा ते वीस वर्षे अध्यापनाचा अनुभव प्रतिशत 17.64 विद्यार्थी शिक्षकांना आहे तर वीस वर्षापेक्षा अधिक काळ अध्यापन अनुभव असलेल्या विद्यार्थी शिक्षकांचे प्रतिशत प्रमाण 5.88 आहे. इतकेच प्रमाण असणा-या (5.88 प्रतिशत ) विद्यार्थी शिक्षकांनी उत्तर दिलेले नाही.

पाठयक्रम काठिण्यता :

सैद्धांतिक भागामध्ये विविध पाठयक्रमांचा समावेश असून त्यापैकी विषयाची काठिण्यता खालील कोष्टकात दिसून येते.

कोष्टक 4

सैद्धांतिक भाग

अभ्यासातील अवघड विषय

| पाठयक्रम | पाठयक्रम 1 | पाठयक्रम 2 | पाठयक्रम 3 | पाठयक्रम 4 | पाठयक्रम 5 |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिसादकांची संख्या | 21 | 9 | 21 | 3 | 3 |
| प्रतिशत प्रमाण | 41.17 | 17.64 | 41.17 | 5.88 | 5.88 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत. पाठयक्रम एकअवघड वाटणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 41.18, तर पाठयक्रम दोन अवघड वाटणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 17.14 इतके आहे. पाठयक्रम तीन 41.17 इतक्या' प्रतिसादकांना अवघड वाटतो तर पाठयक्रम चार आणि पाठयक्रम पाच अवघड वाटणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण अनुक्रमे 5.88 व 5.88 असे समान आहे.

सैद्धांतिक विषयातील काही भाग डी. एड्. अभ्यासक्रमात अंतर्भूत केल्याने त्याचा उपयोग बी. एड्. साठी होतो हे कोष्टक 5 वरून दिसून येते.

कोष्टक 5

डी. एड्. साठी झालेला भाग

| अ | अ.नं. | पाठयक्रम क्रमांक | प्रतिसादक संख्या | उत्तर नाही | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | 1. | पाठयक्रम एक | 0 | 51 | |
| | 2. | पाठयक्रम दोन | 16 | 35 | 31.37 |
| | 3. | पाठयक्रम तीन | 20 | 31 | 39.51 |
| | 4. | पाठयक्रम चार | 10 | 41 | 19.60 |
| | 5. | पाठयक्रम पाच | 49 | 2 | 96.07 |

पाठयक्रम एक साठी प्रतिसाद आलेला नाही.

पाठयक्रम दोन साठी डी. एड् मधील झालेला भाग उपयुक्त आहे असे 31.37 प्रतिशत प्रतिसादकांचे मत आहे. पाठयक्रम तीन साठी 39.51 प्रतिशत, पाठयक्रम चार साठी 19.60 प्रतिशत तर पाठयक्रम पाच साठी 96.07 प्रतिशत प्रतिसादकांचे मत डी. एड्. साठी झालेला भाग उपयुक्त आहे असे मत प्रदर्शित केले. भागांची नावे दिलेली नाहीत.

संदर्भ ग्रंथाचे वाचन :

विद्यापीठाने पुरविलेल्या अध्यापन पुस्तिकेबरोबर संदर्भग्रंथांची यादी दिलेली आहे. विषयातील सखोलता येण्यासाठी संदर्भग्रंथांचे वाचन करणे आवश्यक आहे. ते कोष्टक 6 मध्ये दिले आहे.

कोष्टक 6

संदर्भ ग्रंथांचे वाचन

| अ.नं. | पाठयक्रम क्रमांक | वाचलेले संदर्भग्रंथ | प्रतिसादकांची संख्या | | उत्तरे नाही. | प्रतिसादक शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रतिसादक | उत्तरे नाही |
| 1. | पाठयक्रम 1 | कुंडले म. वा. शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र | 9 | | 42 | 17.64 | 82.35 |
| 2. | पाठयक्रम 2 | दांडेकर वा. ना. शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र | 1 + 10 = | 11 | 40 | 21.56 | 78.43 |
| 3. | पाठयक्रम 3 | 1. कोचर - एज्युकेशनल ॲन्ड व्होकेशनल गाईडन्स | 3 | | | | |
| | | 2. दांडेकर वा. ना. शैक्षणिक मूल्यमापन. | + 3 = | 6 | 45 | 11.76 | 88.23 |
| 4. | पाठयक्रम 4 | कुंडले म. बा. मराठी अध्यापन पद्धती | 3 | | | | |
| | | कदम, बोंदार्डे - शास्त्र अध्यापन पद्धती. | + 1 = | 4 | 47 | 7.84 | 92.15 |
| 5. | पाठयक्रम 5 | एन्. सी. ई. आर्. टी. प्रौढ शिक्षण. | 3 | | | | |
| | | एन्. सी. ई. आर्. टी. - लोकसंख्या शिक्षण | + 3 = | 6 | 45 | 11.76 | 88.23 |

पाठयक्रम एक साठी कुंडले यांचा संदर्भग्रंथ वाचणारांचे प्रतिशत प्रमाण 17.64 इतके आहे.
पाठयक्रम दोन साठी प्रतिशत 21.56 विद्यार्थी शिक्षकांनी दांडेकर यांच्या संदर्भग्रंथ वाचला आहे.
पाठयक्रम तीन साठी कोचर व दांडेकर यांचे संदर्भग्रंथ वाचणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 11.76 आहे.
पाठयक्रम चार करिता फक्त मराठी व शास्त्र या विषयांचे कुंडले, कदम व बोंदार्डे यांचे संदर्भग्रंथ वाचणारांचे प्रतिशत प्रमाण 7.84 आहे.
इतर विषयांच्या संदर्भग्रंथांबद्दल प्रतिसादकांचा प्रतिसाद नाही.
एन्. सी. ई. आर्. टी. च्या संदर्भग्रंथांचा अभ्यास करणा-या प्रतिसादकांचे प्रमाण 11.76 प्रतिशत आहे.
बहुसंख्य प्रशिक्षणार्थी संदर्भग्रंथांचे वाचन करीत नाहीत. पूर्णतः पुस्तिकेवर अभ्यास करणारे प्रशिक्षणार्थी आहेत. तरीपण दांडेकर वा. ना. यांचा " शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र" हा संदर्भग्रंथ ब-याच प्रमाणात वाचला जातो.

विषयाचे सखोल ज्ञान होण्यासाठी संदर्भग्रंथ वाचणे आवश्यक असूनसुद्धा संदर्भग्रंथाचे वाचन विद्यार्थी करीत नाहीत. यामागची कारणे कोणती आहेत हे कोष्टक 7 मधून दिसून येते.

कोष्टक 7

संदर्भग्रंथ न वाचण्याची कारणे.

| अ. नं. | कारणे. | प्रतिसादक संख्या होय | नाही | उत्तर नाही | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वेळ नाही. | 24 | - | | 47.05 |
| 2 | पुस्तकातील माहिती पुरेशी | 9 | - | 12 | 29.41 |
| 3. | संदर्भग्रंथ उपलब्ध होत नाहीत | 6 | - | | 11.76 |
| 4. | इतर | - | - | | |
| | एकूण | 39 | - | 12 | 51 / 100 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

सदंभ्रग्रंथ न वाचणा-या कारणामध्ये वेळ नाही असे कारण देणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 47.05 असून पुस्तकातील माहिती पुरेशी असल्याने संदर्भग्रंथांचे वाचन नाही असे मत प्रतिशत 29.41 प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केले. प्रतिशत 11.76 विद्यार्थी शिक्षक संदर्भग्रंथ उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे वाचले जात नाहीत असे मत दर्शवितात.

विद्यार्थ्यांनी वाचन करावयाचे साहित्य हे नेहमी सुबोध भाषेत असावे. मुक्त विद्यापीठाने ज्या पुस्तिका तयार केलेल्या आहेत, त्या पुस्तिका नेहमी विद्यार्थ्यांकडून वाचनात येतात. या पुस्तिकांची भाषा कशी आहे याचे विवेचन कोष्टक 8 करते.

कोष्टक 8

पुस्तिकेतील भाषा

| अ.नं. | भाषेचा तपशील | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | सुबोध | 36 | 70.58 |
| 2. | कठीण | 12 | 23.52 |
| 3.3. | उत्तर नाही | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

पुस्तिकेतील भाषा सुबोध आहे असे मत प्रतिशत 70.58 प्रशिक्षणार्थींनी प्रदर्शित केले असून पुस्तिकेची भाषा कठीण आहे असे 23.52 प्रतिशत प्रशिक्षणार्थींना वाटते. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 5.88 इतके आढळले.

एकूणच अध्यापन पुस्तिकेची भाषा सुबोध आहे.

काही ठिकाणी भाषा कठीण आहे.

' मानसशास्त्रीय अधिष्ठान ' या पुस्तिकेतील पारिभाषिक शब्दांमुळे भाषा अवघड जाते.

मार्गदर्शन :

प्रशिक्षण कालखंडात वेळोवेळी प्राध्यापकांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक असते. प्रशिक्षणार्थी हे कशाप्रकारे घेतात हे पुढील कोष्टक 9 वरून दिसून येईल.

कोष्टक 9

प्राध्यापकांचे मार्गदर्शन

| अ.नं. | मार्गदर्शनाचा तपशील | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | मार्गदर्शन घेणारे | 24 | 47.05 |
| 2. | मार्गदर्शन न घेणारे | 18 | 35.29 |
| 3. | उत्तर नाही. | 9 | 17.64 |
| | एकूण | 51 | 100 |

प्राध्यापकांचे मार्गदर्शन घेणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण 47.05 प्रतिशत इतके आढळले. तर मार्गदर्शन न घेणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण 35.29 प्रतिशत आढळले. 17.64 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी उत्तर दिलेले नाही.

प्रशिक्षणार्थी अभ्यासस्थळ :

सतत अभ्यास करणे गरजेचे असते. : अभ्यासासाठी अनुकूल जागा असणे आवश्यक असते. अभ्यासाच्या अनुकूल जागेसंबंधीची प्रशिक्षणार्थींची मते खालील कोष्टक 10 मध्ये दिलेली आहेत.

कोष्टक 10

अभ्यास करण्याचे ठिकाण

| अ.नं. | ठिकाणाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1. | निवांत, योग्य व व्यवस्थित | 30 | 58.82 |
| 2. | योग्य ठिकाण नाही | 18 | 35.29 |
| 3. | उत्तर नाही | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

निवांत, योग्य व व्यवस्थित असे अभ्यास करण्याचे ठिकाण असणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रतिशत प्रमाण 58.82 इतके असून अभ्यास करण्यासाठी योग्य ठिकाण नाही असे मत प्रदर्शित करणा-यांचे प्रतिशत प्रमाण 35.29 आढळले. तर 5.88 प्रतिशत प्रतिसादकांनी उत्तर दिलेले नाही.

अध्ययन स्थलास पर्याय :

अध्ययन हा प्रशिक्षणार्थीला अविभाज्य भाग असून तो पूर्ण करण्यासाठी ते विविध ठिकाणांचा वापर करतात. याबद्दलची मते कोष्टक ।। मध्ये नमूद केली आहेत.

कोष्टक ।।

निवांत जागा नसल्यामुळे अभ्यास करण्याची पद्धती.

| अ.न. | निवांत जागा नसण्याचा तपशील | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1. | शेतात | 9 | 5.88 |
| 2. | पहाटे व रात्री | 18 | 11.76 |
| 3. | सुट्टीत | 9 | 5.88 |
| 4. | उत्तर नाही | 18 | 11.76 |

प्रतिसाद पर्याप्त आहे.

शेतात अभ्यास करणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 5.88 असून पहाटे व रात्री जागून अभ्यास करणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 11.76 आहे. सुट्टीत अभ्यास करणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 5.88 आढळले तर उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 11.76 इतके आहे.

अभ्यासक्रम कालावधी

मुक्त विद्यापीठांचा प्रचलित अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा कालखंड तीन सत्रांचा असून प्रशिक्षणार्थींच्या दृष्टीने तो किती कालखंडाचा असावा हे पुढील कोष्टक 12 वरून स्पष्ट होईल.

कोष्टक 12

अभ्यासक्रमाचा कालावधी

( अपेक्षित सत्रांची संख्या )

| अ.नं. | अपेक्षित सत्रांची संख्या | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1. | तीन सत्रे | 24 | 47.05 |
| 2. | चार सत्रे | 24 | 47.05 |
| 3. | सहा सत्रे | 2 | 3.42 |
| 4. | उत्तर नाही | | - |
| | एकूण | 51 | 100 |

अभ्यासक्रमाचा कालावधी तीन सत्रांचा असावा असे मत **प्रदर्शित** करणारे प्रशिक्षणार्थी 47.05 प्रतिशत असून अभ्यासक्रम चार सत्रांचा असावा असेही मत तितक्याच म्हणजे 47.05 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी नोंदविले आहे. सहा सत्रांचा कालावधी असावा असे प्रतिशत 3.92 प्रशिक्षणार्थींना वाटते तर कालावधी आठ सत्रंचा असावा असे 1.96 प्रतिशत प्रतिसादकांनी मत नोंदविले आहे.

सुट्टीचा अभ्यासावर परिणाम

रोजच्या धावपळीच्या जीवनात बदल म्हणून सुट्टीची आवश्यकता असते. पण प्रशिक्षण कालखंड सुट्टीत असल्याने कंटाळवाणे होते. काहींना ' कामात बदल ' हीसुद्धा विश्रांती वाटते हे खालील कोष्टक 13 वरून दिसून येईल.

कोष्टक 13

सुट्टीमुळे अभ्यासावर होणारा परिणाम

| अ.नं. | सुट्टीमध्ये अभ्यासाचा तपशील | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | सुट्टीत चांगला अभ्यास होतो. | 14 | 27.44 |
| 2. | सुट्टीत अभ्यास कंटाळवाणा वाटतो. | 6 | 11.76 |
| 3. | उत्तर नाही | 31 | 60.78 |
| | | 51 | 100 |

सुट्टीत चांगला अभ्यास होतो असे मत असणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 27.44 असून सुट्टीत अभ्यास करणे कंटाळवाणे वाटते असे मत प्रदर्शित करणारे 11.76 प्रतिशत प्रतिसादक आहेत. तर 60.78 प्रतिशत प्रतिसादकांनी उत्तर दिलेले नाही.

अध्ययनातील अडचणी :

सुट्टीतील कालखंडात प्रशिक्षण असल्याने कंटाळा आलेला असतो व त्यामुळे अध्ययनात लक्ष लागत नाही. त्याची कारणे खालील कोष्टकात दिलेली आहेत.

कोष्टक 14

अभ्यास करताना येणा-या अडचणी

| अ.नं. | अडचण | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | विस्मरण | 3 | 5.88 |
| 2. | सांसारिक अडचणी | 12 | 23.52 |
| 3. | शालेय कामकाज | 16 | 33.33 |
| 4. | मुलांचे शिक्षण | 3 | 5.88 |
| 5. | मनाची एकाग्रता न होणे | 9 | 17.64 |
| 6. | संदर्भाशिवाय अभ्यास केला जातो. | 1 | 1.96 |
| 7. | अभ्यासाची सवय मोडली. | 47.84 | 7.84 |
| 8. | वेळेवर प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळत नाही. | 4 | 7.84 |
| 9. | शाळा व अभ्यास यांची सांगड बसत नाही. | 1 | 1.96 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

विस्मरण, मुलांचे शिक्षण या अडचणी या अडचणी असणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण प्रत्येकी 5.88 आहे, तर अभ्यासाची सवय मोडल्याने व वेळेवर प्राध्यापकांचे मार्गदर्शन न मिळाल्याने अभ्यास करताना अडचणी येतात असे मत प्रतिशत 7.84 प्रतिसादकांनी मांडले. शालेय कामकाज ही प्रमुख अडचण आहे असे मानणारे 33.33 प्रतिशत प्रशिक्षणार्थी आहेत.

शाळा व अभ्यास यांची सांगड बसत नाही तसेच संदर्भाशिवाय अभ्यास केला जातो असे प्रतिशत 1.96 प्रतिसादक प्रतिसाद नोंदवितात तर सांसारिक अडचण ही मुख्यतः 23.52 प्रतिशत प्रतिसादकांना महत्वाची वाटते. मनाची एकाग्रता न होणे हे 17.64 प्रतिशत प्रतिसादकांचे मत आढळते.

अध्ययनातील अडचणींवर उपाय :

येणा-या विविध अडचणींवर प्रशिक्षणार्थींनी जे उपाय सुचविले आहेत ते कोष्टक 15 मध्ये नमूद करण्यात आले आहेत.

पुढील पृष्ठावर.

अध्ययनातील अडचणींवरील उपाय : येणा-या विविध अडचणींवर प्रशिक्षणार्थींनी जे उपाय सुचविले आहेत, ते कोष्टक 15 मध्ये नमूद करण्यात आले आहेत.

कोष्टक 15

अडचणींवर सुचविलेले उपाय

| अ.नं. | उपाय | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | प्रापंचिक अडचणींवर मात करावी. | 3 | 5.88 |
| 2. | वेळेचे नियोजन करावे. | 3 | 5.88 |
| 3. | चर्चा करावी. | 3 | 5.88 |
| 4. | सत्रामध्ये वाढ करावी | 8 | 15.68 |
| 5. | संदर्भ ग्रंथांचे वाचन | 3 | 5.88 |
| 6. | अध्यापकांचे मार्गदर्शन | 12 | 23.52 |
| 7. | सतत थोडा अभ्यास | 12 | 23.52 |
| 8. | साधने व वेळ यांचा मेळ घालणे. | 1 | 1.96 |
| 9. | उत्तर नाही. | 6 51 | 11.76 100 |

वेळेचे नियोजन, प्रापंचिक अडचणींवर मात, चर्चा, संदर्भग्रंथांचे वाचन, हे प्रत्यके उपाय प्रतिशत 5.38 इतक्या प्रशिक्षणार्थींनी सुचविले आहेत. तर सत्रामध्ये वाढ करावी असे 15.68 प्रतिशत प्रशिक्षणार्थींचे, अध्यापकांचे मार्गदर्शन घ्यावे व सतत थोडा अभ्यास करावा असे मत प्रतिशत 23.52 प्रतिसादकांनी नोंदविले आहे. साधने व वेळ यांचा मेळ घालाव असे एका प्रतिसादकाला ( 1.96 प्रतिशत ) वाटते तर उत्तर देण्यास उदासीन असणारे प्रतिसादक प्रतिशत 11.76 आहेत.

नित्यनैमित्तिक कामावरील **परिणाम :**

सुट्टीतील अभ्यासक्रमाने **विद्यार्थ्यांच्या** नित्यनैमित्तिक कामावर व विश्रांतीवर परिणाम होतो **अध्यापनातील अडचणींबरोबरच प्रशिक्षणार्थींना कौटुंबिक अपेक्षा व अडचणी, शारीरिक व मानसिक ताण, थकवा** यामुळे विश्रांतीची गरज असते हे कोष्टक 16 वरून दिसून येईल.

कोष्टक 16

सुट्टीचा नित्यनैमित्तिक कामावर होणारा परिणाम.

| अ.नं. | नित्यनैमित्तिक कामसाठी | प्रतिसादक संख्या | | | | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरेसा | पुरेसा नाही | उत्तर नाही | एकूण | |
| 1. | विश्रांतीसाठी वेळ | 6 | - | - | 6 | 11.76 |
| 2. | कौटुंबिक कामासाठी मिळणारा वेळ | - | 42 | - | 42 | 82.35 |
| 3. | उत्तर नाही. | - | - | 3 | 3 | 5.88 |
| | | | | | 51 | 100 |

सुट्टीतील सत्रामुळे 11.76 प्रतिशत प्रतिसादक विश्रांतीसाठी वेळ पुरेसा आहे असे म्हणतात तर 82.35 प्रतिशत प्रतिसादक कौटुंबिक कामासाठी पुरेसा वेळ मिळत नाही असे मत व्यक्त करतात तर प्रतिशत 5.88 प्रतिसादकांनी उत्तर दिलेले नाही.

सैद्धांतिक भागाचा उपयोग :

सैद्धांतिक भागाच्या पायावर प्रात्यक्षिक भागाचा कळस चढत असतो. व या ज्ञानाचा प्रात्यक्षिकासाठी उपयोग होतो हे कोष्टक 17 मधून दृगोचर होते.

कोष्टक 17

सैद्धांतिक भागाचा प्रात्यक्षिकासाठी उपयोग

| अ.नं. | सैद्धांतिक भागाचा तपशील | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | प्रात्यक्षिकासाठी उपयोग होतो. | 45 | 88.23 |
| 2. | प्रात्यक्षिकासाठी उपयोग होत नाही. | 3 | 5.88 |
| 3. | उत्तर नाही. | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

सैद्धांतिक भागाचा उपयोग प्रात्यक्षिकासाठी उपयोग होतो असे मत व्यक्त करणारे प्रतिसादक 88.23 प्रतिशत इतके, तर प्रात्यक्षिकासाठी उपयोग होत नाही असे मत असणारे 5.88 प्रतिसादक आणि तितकेच ( 5.88 प्रतिशत ) उत्तर देण्यास उदासीन आहेत.

अहवाल लेखन :

प्रात्यक्षिक भाग पूर्ण केल्यानंतर त्याचे अहवाल लेखन करणे गरजेचे असते. त्यासाठी विद्यार्थ्यांना लागलेल्या कालावधीचे विश्लेषण कोष्टक 18 मध्ये दिले आहे.

कोष्टक 18

प्रात्यक्षिक भाग - पाठयक्रम एक

अहवाल लेखनाला लागलेला कालावधी ( आठवडे )

| एक | दोन | तीन | त्यापेक्षा जास्त | उत्तर नाही | प्रतिसादक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 3 | - | 45 | - | 51 |
| 5.88 | 5.88 | | 88.23 | | 100 |

अहवाल लेखनासाठी एक आठवडा कालावधी लागतो असे 5.88 प्रतिशत, दोन आठवडे कालावधी लागतो असे 5.88 प्रतिशत, तर त्यापेक्षा जास्त कालावधी लागणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण 88.23 प्रतिशत आहे.

अहवाल लेखन : कालावधी

केंद्रावरून अहवाल लेखनासाठी विद्यार्थ्यांना दिला जाणा-या कालावधीचे विश्लेषण कोष्टक 19 मध्ये दिले आहे.

कोष्टक 19

प्रात्यक्षिक भाग - पाठयक्रम दोन

अहवाल लेखनाचा कालावधी

| अ.नं. | कालावधीचा तपशील | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | कालावधी पुरेसा दिला जातो. | 30 | 58.82 |
| 2. | पुरेसा कालावधी दिला जात नाही | 18 | 35.29 |
| 3. | उत्तर नाही. | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

कालावधी पुरेसा दिला जातो असे प्रतिशत 58.82 प्रतिसादकांना वाटते तर पुरेसा कालावधी दिला जात नाही असे मत 35.29 प्रतिशत प्रतिसादकांनी व्यक्त केले आहे. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 5.88 आहे.

लेखन कालावधीसंबंधी सूचना :

लेखन कालावधीसंबंधी आलेल्या सूचनांचे वर्गीकरण कोष्टक 20 मधील सूचनांच्या स्वरूपावरून स्पष्ट होते.

कोष्टक 20

लेखन कालावधीसंबंधीच्या सूचना

| अ.नं. | सूचनांचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | शैक्षणिक | 12 | 23.52 |
| 2. | सामाजिक | 9 | 17.64 |
| 3. | कौटुंबिक | 12 | 23.52 |
| 4. | शासकीय | 9 | 17.64 |
| 5. | आरोग्यविषयक | 3 | 5.88 |
| 6. | उत्तर नाही. | 6 | 11.76 |
| | एकूण | 51 | 100 |

लेखन कालावधीसंबंधी शैक्षणिक व कौटुंबिक सूचना प्रत्येकी प्रतिशत 23.52, सामाजिक व शासकीय सूचना प्रत्येकी प्रतिशत 17.64, तर आरोग्यविषयक( प्रतिशत 5.88 ), व उत्तर देण्यात उदासीन असणा-या प्रतिशत 11.76 प्रतिसादकांनी आपले मत व्यक्त केले आहे.

विद्यार्थ्यांचा वृत्तेतिहास :

विद्यार्थ्यांचा वृत्तेतिहास लिहिण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड ही अतिशय महत्वाची असते. त्या संदर्भातील माहितीचे विश्लेषण कोष्टक 21 वरून दिसून येते.

कोष्टक 21

विद्यार्थ्यांचा वृत्तेतिहास - विद्यार्थी निवड

| अ.नं. | निवड केलेले विद्यार्थी | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | अभ्यासात अतिप्रगत | 25 | 49.01 |
| 2. | अभ्यासात मागास | 6 | 11.76 |
| 3. | इतर | | |
| 4. | उत्तर नाही | 20 | 39.21 |
| | एकूण | 51 | 100 |

विद्यार्थ्यांचा वृत्तेतिहास लिहिण्यासाठी अभ्यासात अतिप्रगत असणा-या विद्यार्थ्यांची निवड करणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण प्रतिशत 49.01 इतके आहे तर अभ्यासात मागास असणा-या विद्यार्थ्यांची निवड करणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 11.76 आहे. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 39.21 आहे.

विद्यार्थ्यांची मुलाखत :

विद्यार्थ्यांची मुलाखत घेत असताना ती मुलाखत घेण्याचे ठिकाण कोणते आहे ? यावर तिची यशस्विता अवलंबून असते हे कोष्टक 22 वरून स्पष्ट होईल.

कोष्टक 22

विद्यार्थ्यांच्या मुलाखतीचे ठिकाण

| अ.नं. | ठिकाण | प्रतिसादक संख्या | प्रतिशत संख्या |
|---|---|---|---|
| 1. | घरी | 27 | 52.94 |
| 2. | शाळेत | 20 | 39.21 |
| 3. | इतरत्र | 2 | 3.92 |
| 4. | उत्तर नाही | 2 | 3.92 |
| | एकूण | 51 | 100 |

विद्यार्थ्यांची मुलाखत घरी प्रतिशत 52.94 प्रशिक्षणार्थींनी घेतली. शाळेत मुलाखत 39.21 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी घेतली तर इतरत्र मुलाखत घेणा-यांचे व उत्तर न देणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रतिशत प्रमाण समान म्हणजे 3.92 आहे.

मुलाखतीतील अडचणी :

मुलाखत घेत असताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. याचा उहापोह कोष्टक 23 मध्ये केलेला आहे.

कोष्टक 23

मुलाखत घेत असताना आलेल्या अडचणी

| अ.नं. | अडचणी | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1. | सत्यता लपविली जाते. | 36 | 64.70 |
| 2. | उत्तरे देत नाहीत. | 3 | 5.88 |
| 3. | कौटुंबिक अडचणी | 3 | 5.88 |
| 4. | मानसिक दृष्टीने तयार नाही. | 3 | 5.88 |
| 5. | उत्तर नाही | 9 | 17.64 |
| 6. | मुली उत्तरे देताना लाजतात. | 3 | 5.88 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

बहुसंख्य म्हणजेच प्रतिशत 64.70 प्रशिक्षणार्थींना मुलाखत देताना सत्यता लपविली जाते, अशी अडचण आली. तर उत्तर देत नाहीत, कौटुंबिक अडचणी, मानसिक दृष्टीने तयार नसणारांचे व मुली उत्तरे देताना लाजतात या चारही अडचणींचे प्रतिशत प्रमाण सारखेच म्हणजे 5.88 प्रतिशत आहे. 17.64 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी उत्तर दिलेले नाही.

मुलाखतीतील अडचणींवर उपाय :

विद्यार्थ्यांना आलेल्या अनुभवावरून मुलाखत यशस्वी होण्यासाठी त्यांनी सुचविलेल्या उपायांचे वर्गीकरण पुढील कोष्टक 24 मध्ये दिले आहे.

कोष्टक 24

मुलाखत यशस्वी घेण्यासाठी सुचविलेले उपाय.

| अ.नं. | उपाय | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | मित्रत्वाच्या भावनेने घ्यावी | 18 | 35.76 |
| 2. | सुट्टीच्या दिवशी घ्यावी. | 6 | 11.76 |
| 3. | गुप्तता बाळगावी | 18 | 35.76 |
| 4. | मुक्त वातावरण | | |
| 5. | उत्तर नाही. | 9 | 17.64 |
| | एकूण | 51 | 100 |

मित्रत्वाच्या भावनेने मुलाखत घ्यावी असा यशस्वी मुलाखतीकरिता उपाय सुचविलेले व मुलाखतोची गुप्तता बाळगावी असेही सुचविणारे समप्रमाण असणारे प्रशिक्षणार्थी प्रतिशत 35.76 आहेत तर मुलाखत सुट्टीच्या दिवशी घ्यावी असे प्रतिशत 11.76 प्रतिसादक सुचवितात. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रमाणही प्रतिशत 17.64 इतके आढळते.

अडचणींचे शिक्षकांकडून निराकरण :

विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण करणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे. सद्य परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या अडचणींचे **निराकरण** करणा-या शिक्षकांचे प्रमाण कोष्टक 25 दर्शविते.

कोष्टक 25

विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण करणा-या शिक्षकांचे प्रमाण

| अ.नं. | अडचणींचे निराकरण | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | निराकरण होते | 42 | 82.35 |
| 2. | निराकरण होत नाही | 6 | 11.76 |
| 3. | उत्तर नाही | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण 82.35 प्रतिशत प्रतिसादक करतात तर 11.76 प्रतिशत प्रतिशत प्रतिसादकांकडून विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण होत नाही. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 5.88 इतके आढळले.

**पालकांचे सहकार्य** :

विद्यार्थी, पालक व शिक्षक यांची आंतरक्रिया ही शिक्षणप्रक्रियेचा कणा आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्याकरिता पालकांचे सहकार्य मोलाचे असते. ते पुरेसे मिळते किंवा नाही हे कोष्टक 26 वरून दिसून येते.

कोष्टक 26

विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी पालकांचे मिळणारे सहकार्य

| अ.नं. | सहकार्य | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पुरेसे सहकार्य मिळते. | 40 | 78.43 |
| 2. | पुरेसे सहकार्य मिळत नाही. | 8 | 15.68 |
| 3. | उत्तर नाही | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी 78.43 प्रतिशत प्रतिसादकांना सहकार्य मिळते तर प्रतिशत 15.68 प्रतिसादकांना पुरेसे सहकार्य मिळत नाही. उत्तर न देणारे प्रतिसादक प्रतिशत 5.88 एवढे आहेत.

मानसशास्त्रीस प्रयोग :

मानसशास्त्रीय प्रयोग हे विद्यार्थ्यांची मन:स्थिती समजावून घेण्याकरिता अत्यंत आवश्यक आहेत. प्रतिसादकांपैकी एकाही प्रतिसादकाने मानसशास्त्रीय प्रयोगांची नावे दिली नाहीत. तसेच कोणते प्रयोग केंद्रावर व कोणते प्रयोग घरी केले याची कोणतीही नोंद प्रश्नावलीत केलेली नाही.

मानसशास्त्रीय प्रयोगांचा उपयोग दैनंदिन अध्यापनाकरिता होतो किंवा नाही हे कोष्टक 27 वरून दिसून येईल.

कोष्टक 27

मानसशास्त्रीय प्रयोगांचा उपयोग

| अ.नं. | उपयोग | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | उपयोग होतो | 48 | 94.11 |
| 2. | उपयोग होत नाही | | |
| 3. | उत्तर नाही | 3. | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

मानसशास्त्रीय प्रयोगांचा दैनंदिन अध्यापन करताना 94.11 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी उपयोग होतो असे मत व्यक्त केले तर उत्तन न देणा-यांचे प्रतिशत प्रमाण 5.88 इतके आहे.

मानसशास्त्रीय प्रयोगांच्या उपयोगाचे स्वरूप :

मानसशास्त्रीय प्रयोगांचा दैनंदिन अध्यापन करीत असताना वेगवेगळया ठिकाणी उपयोग होतो. या उपयोगाचे स्वरूप कोष्टक 28 दर्शविते.

कोष्टक 28

मानसशास्त्रीय प्रयोगांच्या उपयोगाचे स्वरूप

| अ.नं. | प्रयोगाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र कळते. | 30 | 58.82 |
| 2. | अवघड विषयांचे अध्यापन करताना उपयोग | 3 | 5.88 |
| 3. | अध्यापनाशी निगडीत शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी | 6 | 11.76 |
| 4. | शैक्षणिक व मानसिक प्रक्रिया घडते. | 9 | 17.64 |
| 5. | उत्तर नाही | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

मानसशास्त्रीय प्रयोगाचा उपयोग हा विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र जाणून घेण्यासाठी होतो असे मत असणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 58.82 इतके आहे. अध्यापनाशी निगडीत शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी प्रयोगांचा उपयोग होतो असे मत प्रतिशत 11.76 प्रतिसादकांनी नोंदविले तर शैक्षणिक व मानसिक प्रक्रिया घडते असे मत प्रतिशत 17.64 प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केले. अवघड विषयांचे अध्यापन करताना प्रयोगांचा उपयोग होतो असे मत व्यक्त करणारे व उत्तर न देणारे प्रतिसादक यांचे प्रमाण समान म्हणजे 5.88 प्रतिशत आढळले.

गुणांचे सांख्यिकीय विश्लेषण

शैक्षणिक संख्याशास्त्राचा शिक्षकाला गुणांचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी उपयोग होतो. याकरिता विशिष्ट वर्ग का निवडला या मागची कारणे कोष्टक 29 मध्ये दिलेली आहेत.

कोष्टक 29

पाठयक्रम 3 - अंतर्गत चाचणीतील गुणांचे सांख्यिकीय विश्लेषण : वर्गनिवड

| अ.नं. | निवडीची कारणे | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1. | संबंधित वर्गाचा वर्गशिक्षक म्हणून | 21 | 41.17 |
| 2. | सहज उपलब्ध म्हणून | 12 | 23.52 |
| 3. | उत्तर नाही | 18 | 35.29 |
| | एकूण | 51 | 100 |

अंतर्गत चाचणीतील गुणांचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी संबंधित वर्गाचा वर्गशिक्षक म्हणून निवड करणा-यांचे प्रतिशत प्रमाण 41.17 म्हणजे सर्वाधिक आहे. वर्ग सहज उपलब्ध होतो म्हणून प्रतिशत 23.52 प्रतिसादकांनी वर्गाची निवड केली. उत्तर न देणा-यांचे प्रतिशत प्रमाण 35.29 इतके आहे.

मूल्यमापन कृतीसत्राचे आयोजन केले जाते असे शंभर प्रतिशत प्रशिक्षणार्थी म्हणतात. तसेच घटक नियोजनासाठी अभ्यासक्रम, पाठयक्रम, घटक, उपघटक, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे या बाबींची आवश्यकता असते असे शंभर प्रतिशत प्रशिक्षणार्थींचे मत आहे.

पाठयपुस्तक हे शिक्षक, विद्यार्थी व पालक या सर्वांना मार्गदर्शक असते. परंतु त्यातील घटक उद्दिष्टांना व अभ्यासक्रमाला अनुसरून आहेत किंवा नाहीत याकरिता पाठयपुस्तकाचे चिकित्सक परिक्षण करणे अत्यावश्यक आहे हे विद्यार्थ्यांनी अध्यापन पद्धतीद्वारे निवडलेल्या इयत्तांचे वर्गीकरण कोष्टक 30 दाखविते.

कोष्टक 30

पाठयपुस्तकाच्या चिकित्सक परीक्षणासाठी निवडलेली इयत्ता

| अ.नं. | अध्यापन पद्धती | प्रतिसादक संख्या | | | | | | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाचवी | सहावी | सातवी | आठवी | नववी | दहावी | |
| 1. | मराठी | | 3 | | | | | 5.88 |
| 2. | इतिहास | 3 | 3 | 3 | | | | 17.64 |
| 3. | भूगोल | | | 3 | | | | 5.88 |
| 4. | इंग्रजी | | | | 3 | | | 5.88 |
| 5. | हिन्दी | | | | 3 | | | 5.88 |
| 6. | उत्तर नाही. | 30 | | | | | | 58.82 |
| | एकूण. | 33 | 6 | 6 | 6 | | | 51/100 |
| | | 64.70 | 11.76 | 11.76 | 11.76 | | | |

पाठयपुस्तकाचे चिकित्सक परीक्षण करण्याकरिता 5.88 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी पाचवीचा वर्ग निवडला तर 11.76 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी सहावीचा वर्ग निवडला. सातवीचा वर्ग निवडणा-यांचे प्रतिशत प्रमाण 11.76 इतके असून 11.76 प्रतिशत इतक्या प्रशिक्षणार्थींनी आठवीचा वर्ग निवडला आहे. विषयवार वर्गनिवडीचे विश्लेषण वरील कोष्टकात दिलेले आहे.

ऐच्छिक विषयांकरिता निवडलेली प्रात्यक्षिके व त्यांचे वर्गीकरण कोष्टक 31 दर्शविते.

कोष्टक 31

पाठयक्रम 5 - निवडलेला विषय व प्रात्यक्षिक

| अ.नं. | विषय | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण | प्रात्यक्षिक | कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | शैक्षणिक तंत्रविज्ञान | 3 | 5.88 | उत्तर नाही | -- |
| 2. | लोकसंख्या शिक्षण | 21 | 41.17 | सर्वेक्षण | शैक्षणिक व कामगारक्षमता सक्ती. |
| 3. | | | | | |
| 3. | **प्रौढ व अनौपचारिक शिक्षण.** | 21 | 41.17 | निरक्षर प्रौढास साक्षर करणे. | काळाची गरज. |
| 4. | उत्तर नाही. | 6 | 11.76 | | |
| | एकूण | 51 | 100 | | |

शैक्षणिक तंत्रविज्ञान हा ऐच्छिक विषय निवडलेल्या प्रशिक्षणार्थींचे प्रतिशत प्रमाण 5.88 आहे. यातील कोणीही प्रात्यक्षिकाचे नाव तसेच कारण दिलेले नाही.

लोकसंख्या शिक्षण हा ऐच्छिक विषय निवडलेल्या प्रशिक्षणार्थींचे प्रतिशत प्रमाण 41.17 आहे. त्यांनी सर्वेक्षण हे प्रात्यक्षिक निवडलेले दिसते. तसेच शैक्षणिक महत्व, कामगारक्षमतेचे महत्व व सक्तीचे असावे असे वाटते, ही कारणे दिली आहेत.

प्रौढ व अनौपचारिक शिक्षण हा ऐच्छिक विषय निवडलेले 41.17 प्रतिशत प्रशिक्षणार्थी आहेत. त्या सर्वांनी निरक्षरतेचे निर्मूलन ही काळाची गरज असल्याने सदर प्रात्यक्षिक निवडले हे कारण दिले आहे. 11.76 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी उत्तरच दिले नाही.

सूक्ष्म अध्यापन :

सूक्ष्म अध्यापन कृतीसत्राचे आयोजन कोणत्या प्रकारे होते याबाबतची विद्यार्थ्यांची मते कोष्टक 32 मध्ये स्पष्ट केली आहेत.

कोष्टक 32

सूक्ष्म अध्यापन : सूक्ष्म अध्यापन कृतीसत्राचे स्वरूप

| अ.नं. | कृतिसत्राचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | | | | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | उत्तर नाही | एकूण | |
| 1. | कृत्रिसत्राचे आयोजन | 48 | - | 3 | 51 | 94.11 |
| 2. | सूक्ष्म अध्यापन पाठांचे दिग्दर्शन | 48 | - | 3 | 51 | 94.11 |
| 3. | सूक्ष्म अध्यापन पाठ तयारीस पुरेसा वेळ | 42 | - | 9 | 51 | 82.35 |

सूक्ष्म अध्यापन कृतीसत्राचे आयोजन केले होते असे 94.11 प्रतिशत प्रशिक्षणार्थींचे मत आहे. सूक्ष्म अध्यापन पाठांचे दिग्दर्शन केले जावे असे तितक्याच म्हणजे प्रतिशत 94.11 प्रशिक्षणार्थींचे मत आहे. सूक्ष्म अध्यापन पाठ तयारिस पुरेसा वेळ मिळतो असे 82.35 प्रतिशत विद्यार्थ्यांनी आपले मत नोंदविले आहे.

प्रगत व अप्रगत कौशल्ये :

प्रगत व अप्रगत कौशल्यांच्या बाबतीत प्रतिसादकांची मते जाणून घेतली. त्यासंबंधात विश्लेषण कोष्टक 33 मध्ये केले आहे.

कोष्टक 33

प्रगत व अप्रगत कौशल्ये

| अ.नं. | कौशल्ये | प्रतिसादक संख्या | | प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | अप्रगत कौशल्ये | प्रगत कौशल्ये | अप्रगत | प्रगत |
| 1. | प्रस्तावना/समारोप | 5 | 4 | 9.80 | 7.84 |
| 2. | प्रश्न विचारणे | 7 | 6 | 13.72 | 11.76 |
| 3. | प्रवलीकरण | 4 | 6 | 7.84 | 11.76 |
| 4. | चेतकबदल | 8 | 6 | 15.68 | 11.76 |
| 5. | फलक लेखन | 2 | 2 | 3.92 | 3.92 |
| 6. | स्पष्टीकरण | 2 | 1 | 3.92 | 1.96 |
| | एकूण | 28 | 25 | 54.88 | 49.00 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

प्रस्तावना हे कौशल्य अप्रगत असणा-या प्रतिसादकांचे प्रतिशत प्रमाण 9.80 असून हे कौशल्य प्रगत असणारे 7.84 प्रतिशत प्रतिसादक आढळतात.

प्रश्न विचारणे हे कौशल्य अप्रगत असणारे 13.72 प्रतिशत प्रतिसादक आढळतात तर 11.76 प्रतिशत प्रतिसादकांचे या कौशल्यावर प्रभुत्व असल्याचे दिसून येते.

चेतक बदल हे कौशल्य अप्रगत असणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 15.68 आहे तर हे कौशल्य प्रगत असणारे 11.76 प्रतिशत इतके प्रतिसादक आहेत.

फलकलेखन हे कौशल्य अप्रगत असणारे 3.92 प्रतिशत प्रतिसादक आहेत तर हे कौशल्य प्रगत असणारे 3.92 इतके आहे.

स्पष्टीकरण हे कौशल्य अप्रगत असणारे 3.92 प्रतिशत इतके प्रतिसादक आहेत तर 1.96 प्रतिशत प्रतिसादक हे कौशल्य प्रगत असणारे आहेत.

सराव पाठ :

सरावपाठाचे दिग्दर्शन केले जाते. याबाबत शंभर प्रतिशत प्रतिसादकांनी सहमती दर्शविली आहे. यावरून महाविद्यालयात / केंद्रात सर्व अध्यापन पद्धतींच्या पाठांचे दिग्दर्शन होते हे दिसून येते.

कोष्टक 34

स्वतःच्या शाळेत सरावपाठ घेताना येणा-या अडचणी

| अ.नं. | अडचणी | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पर्यवेक्षणाची सोय नाही. | 12 | 23.52 |
| 2. | वेळ अपुरा | 9 | 17.64 |
| 3. | शैक्षणिक साहित्य अपुरे | 3 | 5.88 |
| 4. | अडचणी नाहीत | 12 | 23.52 |
| 5. | पाठ घेण्यास भीती वाटते. | 3 | 5.88 |
| 6. | उत्तर नाही | 6 | 11.76 |
| 7. | वर्गव्यवस्थापनातील अडचणी | 1 | 1.96 |
| | एकूण | 51 | 100 |

स्वतः अध्यापन करीत असलेल्या शाळेत सरावपाठ घेताना 23.52 प्रतिशत प्रतिसादक पर्यवेक्षणाची सोय नाही अशी अडचण नमूद करतात. तसेच वेळ अपुरा असतो असे 17.64 प्रतिशत प्रतिसादक मत व्यक्त करतात. शैक्षणिक साधन अपुरे असल्याने सरावपाठ घेताना अडचण येणारांचे प्रमाण 5.88 प्रतिशत तर पाठ घेण्यास भीति वाटते असे मत व्यक्त करणारे 5.88 प्रतिशत प्रतिसादकच आहेत. कोणत्याही अडचणी येत नाहीत असे 23.52 प्रतिशत प्रतिसादकांना ठामपणे वाटते, तर 11.76 प्रतिशत प्रतिसादकांनी उत्तर दिलेले नाही. वर्गव्यवस्थापनातील अडचणी येणारे प्रतिसादक 1.96 प्रतिशत आहेत.

केंद्रातील सरावपाठ व शाळेतील सरावपाठ यातील फरक जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीत प्रश्न विचारला होता. त्याबाबत प्रतिसादकांची मते व त्यांचे विश्लेषण कोष्टक 35 मध्ये केले आहे.

कोष्टक 35

केंद्रातील सरावपाठ व शाळेतील सरावपाठ यातील फरक

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | केंद्रात दबाव | 21 | 41.18 |
| 2. | अनोळखी विद्यार्थी | 12 | 23.52 |
| 3. | खूप तयारी करावी लागते. | 6 | 11.76 |
| 4. | तज्ज्ञ निरीक्षक असतात | 6 | 11.76 |
| 5. | उत्तर नाही | 6 | 11.76 |
| | एकूण | 51 | 100 |

केंद्रातील सरावपाठ व शाळेतील सरावपाठ याबाबतचे मत व्यक्त करताना केंद्रात पाठ घेताना दबाव येतो असे मत 41.18 प्रतिशत प्रशिक्षणार्थी नोंदवितात तर अनोळखी विद्यार्थी असल्याने पाठावर परिणाम होतो असे मत असणारे प्रतिशत 23.52 प्रशिक्षणार्थी आहेत. खूप तयारी करावी लागते, तज्ज्ञ निरीक्षक असतात व उत्तर न देणारे प्रतिसादक यांचे प्रतिशत प्रमाण एक सारखेच म्हणजे 11.76 इतके आहे.

**सहाध्यायी** पाठांचे निरीक्षण :

**प्रशिक्षण** काळात **सहाध्यायी** प्रशिक्षणार्थींच्या पाठांचे निरीक्षण करावयाचे असते. त्याबाबतची **मते** पुढील कोष्टक 36 मध्ये नमूद केली आहेत.

कोष्टक 36

**सहाध्यायांच्या** पाठांचे निरीक्षण

| अ.नं. | **सहाध्यायांच्या** पाठांचे निरीक्षण | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | निरीक्षण करतात | 45 | 88.23 |
| 2. | निरीक्षण करीत नाहीत. | - | |
| 3. | उत्तर नाही. | 6 | 11.76 |
| | एकूण | 51 | 100 |

**सहाध्यायी** पर्यवेक्षित सरावपाठांच्या निरीक्षणांच्या संदर्भात वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, 88.23 प्रतिशत प्रतिसादक **सहाध्यायांच्या** सरावपाठांचे निरीक्षण करतात तर 11.76 प्रतिशत इतके प्रतिसादक उत्तर देण्यास उदासीन आहेत. परंतु जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थी **सहाध्यायांच्या** सरावपाठांचे निरीक्षण करतात असे दिसून आले.

साधनांचा वापर :

प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थींना साहाध्यायी प्रशिक्षणार्थींच्या पाठांचे निरीक्षण करावयाचे असते. त्यासाठी ज्या साधनांचा वापर केला जातो त्यांचे विश्लेषण कोष्टक 37 मध्ये समाविष्ट आहे.

कोष्टक 37

निरीक्षणासाठी वापरलेली साधने

| अ.नं. | साधन | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | मुद्यांच्या आधारे | 45 | 38.23 |
| 2. | फक्त हरबार्टची पंचपदी | 3 | 5.88 |
| 3. | उत्तर नाही | 3 | 5.88 |
| | एकूण | 51 | 100 |

साहाध्यायांच्या पाठांच्या निरीक्षणासाठी मुद्यांचा वापर 38.23 प्रतिशत प्रशिक्षणार्थी करतात तर 5.88 प्रतिशत प्रशिक्षणार्थी हरबार्टच्या पंचपदीचा आधार घेतात. उत्तर न देणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण प्रतिशत 5.88 इतके दिसून आले.

अभिरूप अध्यापन :

मुक्त विद्यापीठाने अभिरूप अध्यापन ही अद्ययावत संकल्पना सुरू केली आहे. परंतु हे पाठ घेताना येणा-या अडचणी त्यांच्या स्वरूपासह कोष्टक 38 मध्ये समाविष्ट केले आहे.

कोष्टक 38

अभिरूप अध्यापन

| अ.नं. | अभिरूप अध्यापनाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | अभिरूप अध्यापनाचा पाठ घेताना येणा-या अडचणी | | |
| | अ) एकावेळी अनेक पाठ. केंद्रात घेतले जातात. | 3 | 5.88 |
| | ब) वातावरण गोंगाट | 21 | 41.17 |
| | क) साहाध्यायांना विद्यार्थी समजणे अवघड. | 6 | 11.76 |
| | ड) अडचणी नाहीत. | 9 | 17.64 |
| | इ) उत्तर नाही. | 12 | 23.52 |
| 2. | प्रत्याभरणासाठी मिळणारा कालावधी | | |
| | अ) पुरेसा | 30 | 58.80 |
| | ब) पुरेसा नाही. | 18 | 34.28 |
| | क) उत्तर नाही | 3 | 5.88 |
| 3. | अभिरूप अध्यापनाचा अहवाल लेखन | | |
| | अ) मुद्यांना अनुसरून | 9 | 17.64 |
| | ब) पुस्तिका | 6 | 11.76 |
| | क) विविध अध्यापन पद्धती | 12 | 23.52 |
| | ड) मार्गदर्शन घेऊन | 12 | 23.52 |
| | इ) उत्तर नाही | 15 | 29.41 |

अभिरूप अध्यापनाचा पाठ घेताना 41.17 प्रतिशत विद्यार्थ्यांना वातावरणात गोंगाट ही अडचण दिसून येते. तर केंद्रात एकाच वेळी अनेक पाठ असतात असे 5.88 प्रतिशत व साहाध्यायांना विद्यार्थी समजणे अवघड जाते असे मत 11.76 प्रतिशत विद्यार्थी शिक्षक कळवितात.

प्रत्याभरणासाठी मिळणारा वेळ बहुसंख्य विद्यार्थ्यांना ( प्रतिशत 58.80 ) पुरेसा वाटतो तर प्रतिशत 34.28 प्रतिशत विद्यार्थ्यांना प्रत्याभरणासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. तर 5.88 प्रतिशत विद्यार्थ्यांनी उत्तर दिलेले नाही.

अभिरूप अध्यापनाचा अहवाल मुद्यांना अनुसरून प्रतिशत 17.64 विद्यार्थी लिहितात, तर 11.76 प्रतिशत विद्यार्थी पुस्तिकेची मदत घेतात. प्रतिशत 23.52 विद्यार्थ्यांना अध्यापन पद्धतीचा वापर होतो तर तर तितकेच विद्यार्थी ( 23.52 प्रतिशत ) मार्गदर्शन घेऊन अहवाल लिहितात.

सहशालेय उपक्रम :

सहशालेय उपक्रम व त्यांच्या उपयोगासंबंधीची मते :

सहल, गीतगायन, स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी केंद्राने आयोजित केलेले सर्व सहशालेय कार्यक्रमांत शंभर प्रतिशत विद्यार्थी सहभागी होतात, परंतु सहशालेय उपक्रमांच्या उपयोगासंबंधी कोणीही मतप्रदर्शन केलेले नाही.

समाजसेवा :

समाजसेवा या उपक्रमांतर्गत विविध स्तरावर विद्यार्थ्यांकडून करून घेतलेल्या समाजकार्याचे विश्लेषण कोष्टक 39 मध्ये नमूद केले आहे.

कोष्टक 39 - समाजसेवा उपक्रम

| अ.नं. | उपक्रम | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | महाविद्यालयीन स्तरावरील समाजसेवा | | |
| | अ) परिसर स्वच्छता | 48 | 94.11 |
| | ब) वर्ग स्वच्छ करणे. | 48 | 94.11 |
| | क) प्रयोगशाळा सफाई. | 12 | 23.52 |
| | ड) उत्तर नाही. | 6 | 11.76 |
| 2. | शाळेत विद्यार्थ्यांकडून करून घेतलेले समाजकार्य | | |
| | अ) परिसर सफाई | 32 | 67.48 |
| | ब) फुलबाग / वृक्षारोपण | 12 | 23.52 |
| | क) रस्ता तयार करणे. | 5 | 9.80 |
| | ड) वर्ग सजावट | 2 | 3.92 |
| 3. | दिलेल्या उपक्रमांपैकी विद्यार्थ्यांकडून समाजासाठी राबविलेला उपक्रम. | | |
| | अ) ग्रामसफाई | 42 | 82.35 |
| | ब) रस्ता बांधणी | 9 | 17.64 |
| | क) साक्षरता | 9 | 17.64 |
| | ड) वृक्षारोपण | 15 | 29.41 |
| | इ) उत्तर नाही | 9 | 17.64 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

महाविद्यालयीन स्तरावरील समाजकार्यामध्ये 94.11 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी परिसर स्वच्छता व वर्ग स्वच्छ करण्याचे काम केले आहे, तर 23.52 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी प्रयोगशाळा सफाईकरिता मदत केली आहे.

विद्यार्थ्यांकडून 67.48 प्रतिशत विद्यार्थ्यांनी परिसर सफाई, 23.52 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी वृक्षारोपण, 9.80 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी रस्ता तयार करणे व 3.92 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी वर्ग सजावट करून घेतली.

कार्यानुभव :

कार्यानुभवातून उत्पादक कार्यांचा विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनात व्यवसायासाठीसुद्धा उपयोग होऊ शकतो. त्यादृष्टीने केंद्रावरील कार्यानुभवाकरिता निवडलेल्या उपक्रमांचे वर्गीकरण कोष्टक 40 दर्शविते.

कोष्टक 40 - कार्यानुभव उपक्रम

| अ.नं. | उपक्रम | प्रतियादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | निवडलेले प्रात्यक्षिक | | |
| | अ) खडू तयार करणे. | 15 | 29.41 |
| | ब) शैक्षणिक साहित्य निर्मिती | 15 | **29.41** |
| | क) विजेच्या उपकरणांची निगा व दुरूस्ती | 5 | 9.80 |
| | ड) विणकाम / भरतकाम | 10 | 19.60 |
| | इ) उत्तर नाही | 1 | 1.96 |
| | फ) पुस्तक बांधणी | 5 | 9.80 |
| 2. | शिक्षक व्यवसायासाठी उपयोग | | |
| | अ) होतो | 42 | 82.36 |
| | ब) होत नाही | | |
| | क) उत्तर नाही. | 9 | 17.64 |
| 3) | प्रात्यक्षिक आर्थिकदृष्टया परवडणारे | | |
| | अ) होय | 42 | 82.36 |
| | ब) नाही | | |
| | क) उत्तर नाही | 9 | 17.64 |

केंद्रावरील प्रात्यक्षिक म्हणून दिलेले सर्व उपक्रम सर्वच्या सर्व प्रतिसादकांनी पूर्ण केलेले दिसून येतात. या उपक्रमांचा उपयोग शिक्षक व्यवसायाकरिता होतो असे बहुसंख्य म्हणजे 82.36 प्रतिशत विद्यार्थ्यांचे मत दिसून आले. तर 17.64 प्रतिशत इतके विद्यार्थी उत्तराबाबत उदासीन दिसले.

बहुसंख्य म्हणजे 82.36 प्रतिशत विद्यार्थ्यांना हे प्रात्यक्षिक आर्थिकदृष्टया परवडणारे वाटते. तर 17.64 प्रतिशत विद्यार्थी उदासीन आढळतात.

स्वाध्याय :

घटकांचे समंत्रण झाल्यानंतर स्वाध्याय दिले जातात. त्यांचा संपर्क सत्रातील चाचणीस किती उपयोग होतो याची माहिती कोष्टक 41 मध्ये दिलेली आहे.

कोष्टक 41 - स्वाध्याय

| अ.नं. | स्वाध्यायाची तयारी व उपयोग | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | स्वाध्यायांची तयारी | | |
| | अ) मित्रांची मदत | 3 | 5.88 |
| | ब) संदर्भग्रंथ / पाठयपुस्तके | 39 | 76.47 |
| | क) मार्गदर्शन | 3 | 5.88 |
| | ड) विचार करण्याची संधी उपलब्ध करून दिली नाही. | 6 | 11.76 |
| 2. | संपर्क सत्रातील चाचणीचा उपयोग | | |
| | अ) होतो | 48 | 94.11 |
| | ब) होत नाही | | |
| | क) उत्तर नाही | 3 | 5.89 |
| 3. | चाचणीचा उपयोग होणारे मुद्दे | | |
| | अ) अभ्यासास चालना मिळते. | 9 | 17.64 |
| | ब) वार्षिक परीक्षेची तयारी होते | 13 | 25.49 |
| | क) अभ्यासक्रमाचे / प्रश्नपत्रिकेचे स्वरूप कळते. | 16 | 31.37 |
| | ड) आत्मविश्वास वाढतो. | 12 | 23.52 |
| | इ) उत्तर नाही | 1 | 1.96 |

स्वाध्यायाच्या तयारीसाठी बहुसंख्य विद्यार्थी ( प्रतिशत 76.47 ) संदर्भग्रंथ व पाठयपुस्तके यांचा वापर करतात तर मित्रांची मदत घेणारे 5.88 प्रतिशत व तितकेच विद्यार्थी ( प्रतिशत 5.88 ) मार्गदर्शन घेऊन स्वाध्याय लिहिणारे आढळले.

विचार करण्याची संधी उपलब्ध करून दिली नाही असे प्रतिशत 11.76 प्रशिक्षणार्थींचे मत आहे

संपर्क सत्रातील चाचणीचा उपयोग या विभागात स्वाध्यायाचा उपयोग होतो असे मत बहुसंख्य म्हणजे 94.11 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केले तर उत्तर न देणा-या विद्यार्थी शिक्षकांचे प्रतिशत प्रमाण 5.89 आहे .

स्वाध्यायासाठी चाचणीचा उपयोग होणारे मुद्दे विचारात घेताना अभ्यासास चालना मिळते असे 17.64 प्रतिशत, वार्षिक परीक्षेची तयारी होते ( 25.49 प्रतिशत ), अभ्यासक्रमाचे / प्रश्नपत्रिकेचे स्वरूप कळते ( 31.37 प्रतिशत ), आत्मविश्वास वाढतो ( 23.52 प्रतिशत ) या प्रमाणात विद्यार्थी शिक्षकांनी मते व्यक्त केली आहेत. उत्तर देण्यास उदासीन असणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण अत्यल्प म्हणजे प्रतिशत 1.96 आहे.

## प्राध्यापक प्रश्नावली

### शैक्षणिक पात्रता :

शिक्षक प्रशिक्षक जर उच्च शैक्षणिक पात्रता असलेला असेल तर त्याने प्रशिक्षित केलेले विद्यार्थी देखील चांगल्या गुणवत्तेचे असतात. कारण शिक्षकाच्या अध्यापनाची गुणवत्ता ही त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेवर अवलंबून असते. प्राध्यापकांच्या शैक्षणिक अर्हतचे विश्लेषण कोष्टक 42 मध्ये केलेले आहे.

कोष्टक 42

शैक्षणिक पात्रता

| शैक्षणिक पात्रता | संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|
| एम्. ए., एम्. एड्. | 3 | 21.43 |
| बी. एस्सी., एम्. एड्. | 2 | 14.29 |
| एम्. एस्सी., एम्. एड्. | 1 | 7.14 |
| एम्. ए., एम्. एड्., एम्. फिल्. | 4 | 28.57 |
| एम्. एस्सी., एम्. एड्., एम्. फिल्. | 2 | 14.29 |
| एम्. ए., एम्. एड्. पीएच्. डी. | 2 | 14.29 |
| एकूण | 14 | 100 |

एम्.ए.,एम्.एड्. प्रतिशत 21.43 प्राध्यापक, एम्. ए., एम्. एड्., एम्. फिल्. झालेले प्राध्यापक प्रतिशत 28.57, एम्. एस्सी, एम्. एड्. झालेले प्रतिशत 7.14 तर बी. एस्सी, एम्. एड्, एम्. एस्सी, एम्. एड्., एम्. फिल् व एम्. ए., एम्. एड्., पीएच्. डी. शैक्षणिक अर्हता असणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण सारखेच म्हणजे 14.29 प्रतिशत आहे.

अध्यापन विषय :

प्राध्यापकांच्या अध्यापनाचे विषय खालील कोष्टकात दिलेले आहेत.

कोष्टक 43 - प्राध्यापकांच्या अध्यापनाचे विषय

| अ.नं. | अध्यापनाचे विषय | अध्यापक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | शिक्षणाचे तात्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान | 3 | 21.43 |
| 2. | शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान | 8 | 57.14 |
| 3. | शिक्षणाचे अधिष्ठान - शालेय व्यवहार. | 4 | 28.57 |
| 4. | अध्यापन पद्धती : | | |
| | मराठी | 1 | 7.14 |
| | हिन्दी | 1 | 7.14 |
| | इंग्रजी | 1 | 7.14 |
| | शास्त्र | 3 | 21.43 |
| | गणित | 3 | 21.43 |
| | इतिहास | 2 | 14.29 |
| | भूगोल | 1 | 7.14 |
| | वाणिज्य | 2 | 14.29 |
| | अर्थशास्त्र | 2 | 14.29 |
| 5. | ऐच्छिक विषय : | | |
| | शैक्षणिक तंत्रविज्ञान | 2 | 14.29 |
| | प्रौढ व अनौपचारिक **शिक्षण** | 1 | 7.14 |
| | लोकसंख्या शिक्षण | 1 | 7.14 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान हा विषय प्रतिशत 57.14 प्राध्यापक शिकवितात. शिक्षणाचे शालेय अधिष्ठान शिकविणारे 28.57 प्रतिशत तसेच शिक्षणाचे तात्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान हा 21.43 प्रतिशत प्राध्यापक शिकवितात. तर सर्व अध्यापन पद्धती जवळजवळ सर्व प्राध्यापक शिकवितात.

अध्यापन अनुभव :

प्राध्यापक जर अनुभवी असतील तर त्यांच्या अध्यापनातदेखील त्याचे प्रतिबिंब दिसते. विद्यार्थ्यांना प्राध्यापकांच्या अनुभवाचा निश्चित फायदा होतो हे कोष्टक 44 मधून दिसून येईल.

कोष्टक 44

प्राध्यापकांचा अध्यापनाचा अनुभव

| अ.नं. | अनुभव ( वर्षात ) | अध्यापक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | माध्यमिक शिक्षक | | |
| | एक ते दहा वर्षे | 8 | 57.14 |
| | अकरा ते वीस वर्षे | 1 | 7.14 |
| | अनुभव नाही. | 5 | 35.71 |
| 2. | मेथड मास्टर | 7 | 50 |
| 3. | लेक्चरर | | |
| | एक ते दहा वर्षे | 6 | 42.85 |
| | अकरा ते वीस वर्षे | 2 | 14.29 |
| | एकवीस ते तीस वर्षे | 3 | 21.43 |
| 4. | समन्वयक ( दोन वर्षे ) | 1 | 7.14 |
| 5. | रीडर | | |
| | एक ते दहा वर्षे | 2 | 14.29 |

प्राध्यापकांचे माध्यमिक स्तरावर अध्यापन करण्याचे प्रतिशत प्रमाण एक ते दहा वर्षांकरिता प्रतिशत 57.14 आहे तर अकरा ते वीस वर्षांकरिता प्रतिशत 7.14 आहे. अनुभव नसणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 35.71 इतके आहे.

मेथड मास्टर म्हणून पूर्वी काम करणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 42.85 आहे.

लेक्चरर म्हणून एक ते दहा वर्षे अनुभव असणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 42.85 इतके आहे तर अकरा ते वीस वर्षे अनुभव असणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 14.29 आहे. एकवीस ते तीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 21.43 आहे.

समन्वयक म्हणून काम करणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 7.14 आहे तर रीडर / प्रपाठक म्हणून काम करणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 14.29 आहे.

सेवांतर्गत प्रशिक्षण :

अभ्यासक्रमातील बदल ( नवीन सुधारणा ) तसेच अद्ययावत ज्ञानाची माहिती शिक्षक प्रशिक्षकाच्या ज्ञानाला परिपूर्ण बनविण्यासाठी तसेच उजाळा देण्यासाठी उपयुक्त ठरत असते. यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण महत्वाचे आहे. सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम . कोष्टक 45 मधून स्पष्ट होईल.

कोष्टक 45

प्राध्यापक सहभागी झालेले सेवांतर्गत प्रशिक्षण

| अ.नं. | सेवांतर्गत प्रशिक्षण | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | चर्चासत्रे | 3 | 21.43 |
| 2. | शिबीरे | 3 | 21.43 |
| 3. | उद्बोधन वर्ग | 6 | 42.85 |
| 4. | उत्तर नाही | 2 | 14.29 |
| | एकूण | 14 | 100 |

प्राध्यापकांनी सेवाकालात चर्चासत्र पूर्ण करणारांचे प्रतिशत प्रमाण 21.43, शिबीरातील सहभागाचे प्रतिशत प्रमाण 21.43 तर उद्बोधन वर्गात सहभागी झालेल्या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 42.85 आहे. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 14.29 आहे.

**प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन :**

सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यकम हे वेगवेगळया संस्था, विद्यापीठे तसेच विद्यापीठातील विविध शिक्षणशास्त्र विभाग यांच्याकडून आयोजित केले जातात. हे कार्यक्रम आयोजित करणा-या संस्था व तेथे उपस्थित प्राध्यापक यांचे विश्लेषण कोष्टक 46 मध्ये दिले आहे.

कोष्टक 46 -

सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करणा-या संस्था

| अ.नं. | आयोजित करणा-या संस्था | प्राध्यापक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1. | यु. जी. सी. | 1. | 7.14 |
| 2. | एन्. सी. ई. आर्. टी. | 2 | 14.29 |
| 3. | एस्. सी. ई. आर्. टी. | 3 | 21.43 |
| 4. | यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ | 2 | 14.29 |
| 5. | कुरूक्षेत्र विद्यापीठ | 2 | 14.29 |
| 6. | रयत शिक्षण संस्था | 1 | 7.14 |
| 7. | शिवाजी विद्यापीठ - शिक्षणशास्त्र विभाग | 2 | 14.29 |
| 8. | गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद | 1 | 7.14 |
| 9. | पुणे विद्यापीठ | 1 | 7.14 |
| 10. | एस्. एन्. डी. टी., मुंबई | 2 | 14.29 |

प्राध्यापकांसाठी प्रशिक्षण आयोजित करणा-या संस्थांमध्ये सहभागी झालेल्या प्राध्यापकांचे प्रमाण यु. जी. सी., रयत शिक्षण संस्था, गुजरात विद्यापीठ व पुणे विद्यापीठ येथे समान म्हणजे प्रतिशत 7.14, एन्. सी. ई. आर्. टी, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, कुरूक्षेत्र विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ - शिक्षण शास्त्र विभाग व एस्. एन्. डी. टी, मुंबई येथेही समान म्हणजे 14.29 प्रतिशत तर एस्. सी. ई. आर्. टी येथे 21.43 प्रतिशत इतके आहे.

संदर्भग्रंथांचे वाचन :

विषयाचे सखोल ज्ञान ही प्राध्यापकांच्या गुणवत्तेचा तसेच अध्यापनाचा पाया असतो. शिक्षकाने आपले ज्ञान हे विविध पुस्तकांच्या संदर्भग्रंथांच्या वाचनाने अद्ययावत ठेवले पाहिजे. प्राध्यापकांनी वाचलेल्या संदर्भ पुस्तकांचे पाठयक्रमानुसार विश्लेषण कोष्टक 47 मध्ये दिसून येईल.

कोष्टक 47 - प्राध्यापकांनी वाचलेली संदर्भ पुस्तके.

| अ.नं. | संदर्भ पुस्तके | प्राध्यापक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1) | कुंडले म. बा. | | |
| | शैक्षणिक तत्वज्ञान व समाजशास्त्र | 2 | 14.19 |
| 2) | दांडेकर वा. ना. | | |
| | शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र | 3 | 21.43 |
| 3) | पाटील लीला | | |
| | शैक्षणिक : प्रशासन | 1 | 7.14 |
| | शिवणेकर | | |
| | माध्यमिक शिक्षण | 1 | 7.14 |
| | पाटील लीला | | |
| | शैक्षणिक समस्या | 1 | 7.14 |
| 4) | | | |
| | कदम - बोंदाडे | 2 | 14.29 |
| | शास्त्र अध्यापन पद्धती | | |
| | पोंक्षे - भूगोल अध्यापन पद्धती | 1 | 7.14 |
| | डॉ. सफाया रघुनाथ | | |
| | हिन्दी अध्यापन पद्धती | | |
| | बोबे - हिन्दी अध्यापन पद्धती | 1 | 7.14 |
| | केणी / कुलकर्णी | | |
| | हिन्दी अध्यापन पद्धती | | |

पुढे चालू..

| अ.नं. | संदर्भ पुस्तके | प्राध्यापक संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| | जगतान ह. ना. | | |
| | गणित अध्यापन पद्धती | | |
| | ओक - गणित अध्यापन पद्धती | | |
| | राऊळ सत्यवती | | |
| | गणित अध्यापन पद्धती | 3 | 21.43 |
| 5. | जगताप - ओक | | |
| | शैक्षणिक तंत्रज्ञान | 3 | 21.43 |
| | प्रौढ व अनौपचारिक शिक्षण - उत्तर नाही | | |
| | लोकसंख्या शिक्षण - उत्तर नाही. | | |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

प्राध्यापकांनी वाचलेल्या संदर्भपुस्तकांमध्ये कुंडले म. बा. यांचे ' शैक्षणिक तत्वज्ञान व समाजशास्त्र ' 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी, दांडेकर वा. ना. यांचे ' शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र ' 21.43 प्रतिशत प्राध्यापकांनी, लीला पाटील यांचे ' शैक्षणिक प्रशासन ' व ' शैक्षणिक समस्या ' प्रतिशत 7.14 प्राध्यापकांनी, शिवणेकर यांचे ' माध्यमिक शिक्षण ' 7.14 प्रतिशत प्राध्यापकांनी, जगताप, ओक यांची ' शैक्षणिक तंत्रविज्ञान ' 21.43 प्रतिशत प्राध्यापकांनी, ही पुस्तके वाचलेली दिसून येतात. तर सर्व अध्यापन पद्धती शिकविणा-यानी या प्रश्नाची उत्तरे दिली आहेत. इंग्रजी अध्यापन पद्धती, प्रौढ व अनौपचारिक शिक्षण, लोकसंख्या शिक्षण या प्राध्यापकांनी पुस्तकाची नावे दिलेली नाहीत.

स्वाध्याय पुस्तिकेचा वापर :

मुक्त विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी स्वाध्यायपुस्तिका पुरविलेल्या आहेत. या पुस्तिकांचा वापर प्राध्यापकसुद्धा करत असतात. स्वाध्याय पुस्तिकेचा वापर करणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण शंभर आहे. स्वाध्यायपुस्तिकेच्या दर्जाबद्दलची प्राध्यापकांची मते कोष्टक 48 मधून दिसून येतात.

कोष्टक 48

स्वाध्यायपुस्तिकेचा दर्जा

| अ.नं. | मत | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | चांगला | 11 | 78.57 |
| 2. | मध्यम | 2 | 14.29 |
| 3. | बरा | 1 | 7.14 |
| 4. | वाईट | - | - |

प्राध्यापकांनी मुक्त विद्यापीठाच्या स्वाध्यायपुस्तिकेचा दर्जा चांगला असे मत व्यक्त करणारे प्रतिशत 78.57 प्राध्यापक आहेत तर मध्यम दर्जा असल्याचे मत प्रतिशत 14.29 प्राध्यापकांनी नोंदविले आहे. तसेच पुस्तिकेचा दर्जा बरा असे मत व्यक्त करणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 7.14 आहे.

दर्जा सुधारण्यासाठी उपाय :

स्वाध्यायपुस्तिकेचे वाचन विद्यार्थी, प्राध्यापक या उभयतांकडून होत असल्याने तिचा दर्जा सुधारणे हे अत्यंत आवश्यक महत्वाचे काम मुक्त विद्यापीठाकडून झाले पाहिजे. याकरिता प्राध्यापकांनी सुचविलेले उपाय कोष्टक 49 मध्ये दिले आहेत.

कोष्टक 49

पुस्तिकेचा दर्जा सुधारण्यासाठी उपाय

| अ.नं. | उपाय | संख्या | प्रतिशत प्रमाण. |
|---|---|---|---|
| 1. | विस्तृत करण्यात यावी | 8 | 57.14 |
| 2. | अभ्यासक्रम सुधारावा | 1 | 7.14 |
| 3. | उत्तर नाही | 5 | 35.71 |
| | एकूण | 14 | 100 |

स्वाध्यायपुस्तिकेचा दर्जा सुधारण्याकरिता पुस्तिका विस्तृत करण्यात यावी असे बहुसंख्य म्हणजे 57.14 प्रतिशत प्राध्यापकांना वाटते. तर अभ्यासक्रम सुधारावा असे 7.14 प्रतिशत प्राध्यापकांचे मत आहे. पुस्तिकेच्या दर्जाबाबत 35.71 प्रतिशत प्राध्यापकांनी उत्तर दिलेले नाही.

संदर्भ साहित्य :

मुक्त विद्यापीठाकडून पुरविले जाणारे संदर्भ साहित्य हे पुरेसे आहे किंवा नाही हे कोष्टक 50 मधून स्पष्ट होते.

कोष्टक 50

संदर्भ साहित्याची उपलब्धता

| मत | संख्या | प्रतिशत प्रमाण |
| --- | --- | --- |
| पुरेसे मिळते. | 6 | 42.85 |
| पुरेसे मिळत नाही. | 7 | 50 |
| उत्तर नाही | 1 | 7.14 |
| एकूण | 14 | 100 |

मुक्त विद्यापीठाचे संदर्भ साहित्य पुरेसे मिळते असे 42.85 प्रतिशत प्राध्यापक मत प्रदर्शित करतात तर पुरेसे संदर्भ साहित्य उपलब्ध होत नाही असे पन्नास प्रतिशत म्हणजे निम्म्या प्राध्यापकांचे मत आढळले. उत्तराबाबत 7.14 प्रतिशत प्राध्यापक उदासीन आहेत.

विषयातील उद्‌दिष्टे :

प्रत्येक शिक्षकाला आपला विषय शिकविताना काही उद्‌दिष्टे ठरवावी लागतात. ही उद्‌दिष्टे साध्य करण्याकरिता पोषक अध्ययन अनुभव देणे आवश्यक असते. परंतु त्यातूनदेखील काही उद्‌दिष्टे दैनंदिन अध्यापनातून साध्य करणे अवघड जाते. बहुतेक प्राध्यापकांनी उपयोजन व कौशल्ये ही उद्‌दिष्टे अवघड वाटली असे मत व्यक्त केले आहे. ही उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी सुचविलेले उपाय कोष्टक 51 मध्ये दर्शविले आहेत.

कोष्टक 51

अवघड उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी उपाय

| अ.नं. | उपाय | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | प्रशिक्षणाचे उपयोजन पाहण्यासाठी मूल्यमापन यंत्रणा हवी. | 2 | 14.29 |
| 2. | स्वाध्यायात विविधता हवी. | 2 | 14.29 |
| 3. | पाठयांशाची मांडणी वेगळया पद्धतीने हवी. | 1 | 7.14 |
| 4. | तंत्रविज्ञान साहित्य पुरविणे | 1 | 7.14 |
| 5. | प्रात्यक्षिकासाठी स्वतंत्र चाचणी घ्यावी. | 1 | 7.14 |
| 6. | कौशल्याचा सराव करून घ्यावा. | 1 | 7.14 |
| 7. | उत्तर नाही. | 6 | 42.86 |
| | एकूण | 14 | 100 |

स्वतःच्या विषयातील अवघड उद्दिष्टे नमूद करताना शंभर प्रतिशत प्राध्यापकांनी उपयोजन व कौशल्य या उद्दिष्ट्यांचा उल्लेख केला.

ही अवघड उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रशिक्षणाचे उपयोजन पाहण्यासाठी मूल्यमापन यंत्रणा हवी व स्वाध्यायात विविधता हवी. असे प्रत्येकी 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी उपाय सुचविले आहेत तर इतर उपायांमध्ये पाठयांशाची मांडणी वेगळया पद्धतीने करावी ( 7.14 प्रतिशत ) व तंत्रविज्ञान साहित्य पुरवावे ( 7.14 प्रतिशत ), प्रात्यक्षिकांसाठी स्वतंत्र चाचणी घ्यावी ( 7.14 प्रतिशत ), इत्यादी उपायांचा समावेश होतो. 42.86 प्रतिशत प्राध्यापकांनी उत्तर दिलेले नाही.

अभ्यासक्रमाचा दर्जा :

कोणत्याही अभ्यासक्रमाचा दर्जा हा इतर सनांतर अभ्यासक्रमाशी तुलना केल्यानंतर ठरवता येतो. मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची तुलना शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाशी केली असता त्यासंबंधीची मते कोष्टक 52 मध्ये दिलेली आहेत.

कोष्टक 52

शिवाजी विद्यापीठ व मुक्त विद्यापीठ यांच्या

अभ्यासक्रमांच्या दर्जांची तुलना

| अभ्यासक्रम दर्जा | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| शिवाजी विद्यापीठ दर्जा ( चांगला ) | 5 | 35.71 |
| मुक्त विद्यापीठ दर्जा ( चांगला ) | 5 | 35.71 |
| दोन्ही समान | 3 | 21.42 |
| उत्तर नाही | 1 | 7.14 |
| एकूण | 14 | 100 |

शिवाजी विद्यापीठ व मुक्त विद्यापीठ यांच्या अभ्यासक्रमाच्या दर्जाची तुलना करता शिवाजी विद्यापीठाचा अभ्यासक्रम तुलनेने चांगला आहे असे 35.71 प्रतिशत प्राध्यापक म्हणतात. तर मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचा दर्जा चांगला असे तितकेच प्राध्यापक ( प्रतिशत 35.71 ) म्हणतात. तर दोन्ही विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाचा दर्जा समान आहे असे मत प्रतिशत 21.42 प्राध्यापक व्यक्त करतात. 7.14 प्रतिशत प्राध्यापक उत्तर देण्यास उदासीन आहेत.

अभ्यासक्रमाचा दर्जा :

शिवाजी विद्यापीठ व मुक्त विद्यापीठ यांच्या दर्जाची तुलना करता मुक्त विद्यापीठाचा दर्जा चांगला असल्याचे काही प्रतिसादक मान्य करतात. त्यांनी हा दर्जा चांगला असण्यामागच्या दिलेल्या कारणांचे विश्लेषण कोष्टक 53 दर्शविते.

कोष्टक 53 - मुक्त विद्यापीठ अभ्यासक्रम चांगल्या दर्जाचा असण्यामागची कारणे.

| अ.नं. | कारणे | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | ज्ञान देण्याचीसंयुक्तिक व आधुनिक पद्धती. | 3 | 21.42 |
| 2. | मूल्यमापन योजना चांगली | 4 | 28.57 |
| 3. | समाजाच्या गरजांवर आधारित ज्ञान | 2 | 14.29 |
| 4. | विद्यार्थ्यांना पुस्तिकेद्वारे सहज चांगल्या प्रकारे ज्ञान मिळते. | 4 | 28.57 |
| 5. | उपयोजनावर भर | 3 | 21.42 |
| 6. | सर्वांगीण अभ्यासक्रम | 1 | 7.14 |
| 7. | उत्तर नाही | 4 | 28.57 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

मुक्त विद्यापीठांचा दर्जा चांगला असण्यामागची मते व्यक्त करताना मूल्यमापनाची चांगली योजना व पुस्तिकेद्वारे सहज ज्ञान असे प्रत्येकी 28.57 प्रतिशत प्राध्यापक कळवितात. इतर कारणांमध्ये ज्ञान देण्याची संयुक्तिक पद्धती व उपयोजनावर भर ( प्रत्येकी 21.42 प्रतिशत ) प्राध्यापकांचे मत आढळते. उत्तर न देणारे 28.57 प्रतिशत प्राध्यापक आढळतात.

नवीन वैकल्पिक विषय :

प्रस्तुत महाविद्यालयात लोकसंख्या शिक्षण, प्रौढ व अनौपचारिक शिक्षण व शैक्षणिक तंत्रविज्ञान या वैकल्पिक विषयांचे अध्यापन केले जाते. पण अद्ययावत ज्ञानाचा, समस्यांचा विस्फोट लक्षात घेता आणखी नवीन वैकल्पिक विषय सुरू करण्याची आवश्यकता ग्राहय धरून प्राध्यापकांनी सुचविलेल्या विषयांचे स्पष्टीकरण कोष्टक 54 मध्ये केले आहे.

कोष्टक 54

सुचविलेले वैकल्पिक विषय

| अ.नं. | वैकल्पिक विषय | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | संगणक शिक्षण | 11 | 78.57 |
| 2. | पर्यावरण शिक्षण | 5 | 35.71 |
| 3. | व्यावसायिक शिक्षण | 2 | 14.29 |
| 4. | मूल्यशिक्षण | 1 | 7.14 |
| 5. | अपंग व समस्याप्रधान मुलांसाठी शिक्षण | 1 | 7.14 |
| 6. | उत्तर नाही | 1 | 7.14 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

महाविद्यालयामधील सध्या व चालू असणा-या वैकल्पिक विषयांव्यतिरिक्त इतर वैकल्पिक विषय सुचविताना बहुसंख्य प्राध्यापकांनी ( 78.57 प्रतिशत ) संगणक शिक्षणावर जास्त भर दिला आहे. तर त्या खालोखाल प्रतिशत 35.71 इतक्या प्राध्यापकांना पर्यावरण शिक्षण हा विषय सुरू करावा असे वाटते.

समूपदेशन :

समूपदेशन किंवा समंत्रण मुक्त विद्यापीठाने स्वयंअध्ययन व मार्गदर्शन यांच्यातील दुवा जोडण्यासाठी व प्राध्यापक व विद्यार्थी यांची आंतरक्रिया वाढविण्यासाठी सुरू केले. परंतु यामध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागाचे प्रमाण हे अत्यल्प दिसते. यामागची कारणे कोष्टक 55 दर्शविते.

कोष्टक 55

समूपदेशनामध्ये विद्यार्थी सहभागी न होण्याची कारणे.

| अ.नं. | कारणे | प्राध्यापक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | अभ्यास केलेला नसतो. | 8 | 57.14 |
| 2. | विषयज्ञानातील मागासलेपणा | 1 | 7.14 |
| 3. | केवळ पदवीकरिता विद्यार्थी येतो | 1 | 7.14 |
| 4. | विद्यार्थ्यांना कृतीबाबतच्या सूचना नसतात. | 3 | 21.42 |
| 5. | मत प्रकट करण्यास घाबरतात | 3 | 21.42 |
| 6. | उत्तर नाही | 4 | 28.57 |

प्रतिसाद पर्याप्त आहेत.

विद्यार्थी समूपदेशनात सहभागी न होण्याचे प्रमुख कारण त्यांनी अभ्यास केलेला नसतो असे 57.14 प्रतिशत म्हणजे बहुसंख्य प्राध्यापकांचे मत आहे तर त्या खालोखाल विद्यार्थ्यांना **कृतीबाबतच्या** सूचना नसतात. ( 21.42 प्रतिशत ) व तितकेच प्रतिशत प्रमाण ( 21.42 ) ते मत प्रकट करण्यासाठी घाबरतात असे प्राध्यापकांना वाटते. विषयज्ञानातील मागासलेपणा व केवळ पदवीकरिता शिक्षण असे प्रत्येकी 7.14 प्रतिशत प्राध्यापकांचे मत आढळले.

समुपदेशनात सहभागी होण्यासाठी उपाय :

सदर प्राध्यापकांनी कोष्टक 55 मधील कारणांचा विचार करून त्यावर उपाययोजना सुचविली आहे. ती कोष्टक 56 मध्ये दिली आहे.

कोष्टक 56

समुपदेशनात सहभागी होण्यासाठी उपाय

| अ.नं. | उपाय | प्राध्यापक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | शैक्षणिक साहित्याची वेळेवर उपलब्धता | 5 | 35.71 |
| 2. | योग्य प्रश्नपद्धतीचा वापर | 2 | 14.29 |
| 3. | पुस्तिकेच्या वापरासाठी उपक्रम | 2 | 14.29 |
| 4. | योग्य स्वाध्याय देणे | 1 | 7.14 |
| 5. | प्रेरणा देणे | 1 | 7.14 |
| 6. | क्लृप्त्यांचा वापर | 1 | 7.14 |
| 7. | पदवीची आवश्यकता पटविणे | 1 | 7.14 |
| 8. | वैयक्तिक लक्ष देणे | 1 | 7.14 |

समूपदेशनात सहभागी होण्यासाठी सुचविलेल्या उपायांमध्ये प्रामुख्याने शैक्षणिक साहित्याची वेळेवर उपलब्धता हवी ( प्रतिशत 35.71 ), योग्य प्रश्नपद्धतीचा वापर व पुस्तिकेच्या वापरासाठी उपक्रम दोन्हीही समान प्रतिशत प्रमाणात ( 14.29 ) असे उपाय आहेत. तर प्रेरणा, योग्य स्वाध्याय, क्लृप्त्यांचा वापर, पदवीचे महत्व व आवश्यकता पटविणे, वैयक्तिक लक्ष देणे असे उपाय प्रत्येकी 7.14 प्रतिशत प्राध्यापक सुचवितात.

दृक-श्राव्य साधने :

दृक-श्राव्य साधनांच्या साहाय्याने अध्यापन केल्यास ते दीर्घकाळ स्मरणात राहते व प्रभावी व परिणामकारक अध्ययनासाठी त्याचा उपयोग होतो. कारण डोळा व कान या ज्ञानेंद्रियांमुळे एकूण चौ-याण्णव प्रतिशत ज्ञान ग्रहण होते. याचा प्राध्यापक कितपत वापर करतात याचे विश्लेषण कोष्टक 57 मध्ये केले आहे.

कोष्टक 57

दृक - श्राव्य साधनांचा वापर

| अ.नं. | दृक - श्राव्य शैक्षणिक साधने | प्राध्यापक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | ओव्हरहेड प्रोजेक्टर | 4 | 28.57 |
| 2. | प्रतिकृती | 3 | 21.42 |
| 3. | टेपरेकॉर्डर | 3 | 21.42 |
| 4. | चित्रे व तक्ते | 5 | 35.71 |
| 5. | नकाशे | 2 | 14.29 |
| 6. | रेखाकृती | 1 | 7.14 |
| 7. | उत्तर नाही | 1 | 7.14 |

प्राध्यापकांनी स्वतः अध्यापन करीत असलेल्या विषयाकरिता वापरलेल्या साधनांमध्ये ओव्हरहेड प्रोजेक्टर ( प्रतिशत 28.57 ), प्रतिकृती व टेपरेकॉर्डर ( प्रत्येकी 21.42 प्रतिशत ), चित्रे व तक्ते (35.71 प्रतिशत), नकाशे ( 14.29 प्रतिशत ), रेखाकृती ( 7.14 प्रतिशत ) इ. साधने वापरलेली दिसून येतात. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 7.14 आहे.

प्रात्यक्षिक भाग :

मुक्त विद्यापीठाने प्रत्येक पाठयक्रमाकरिता प्रात्यक्षिक भाग हा अनिवार्य केला आहे. त्यासाठी या प्रात्याक्षिक कार्याचे निर्दोष मूल्यमापन करणे आवश्यक आहे. हे मूल्यमापन करताना प्राध्यापकांना येणा-या अडचणींचे विश्लेषण कोष्टक 58 मध्ये केले आहे.

कोष्टक 58

प्रात्यक्षिकाच्या मूल्यमापनातील अडचणी

| अ.नं. | अडचण | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | मूल्यमापनास पुरेसा वेळ मिळत नाही. | 12 | 85.71 |
| 2. | उत्तर नाही | 2 | 14.29 |
| | एकूण | 14 | 100 |

प्रात्यक्षिक कामाचे मूल्यमापन करताना येणा-या अडचणींमध्ये बहुसंख्य प्राध्यापक ( 85.71 प्रतिशत ) मूल्यमापनास पुरेसा वेळ मिळत नाही असे सुचवितात तर 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी उत्तर दिलेले नही.

काही वेळेला प्रात्यक्षिक कार्य विद्यार्थ्यांकडून पूर्ण केले जात नाही. अशा वेळी त्याचे कोणत्या प्रकारे मूल्यमापन करावे हा संभ्रम पडतो. अशा परिस्थितीत अंतर्गत गुण कमी पडतात या कारणावरून सढळ हाताने गुण दिले जातात किंवा नाही ते कोष्टक 59 मधून स्पष्ट होईल.

कोष्टक 59

प्रात्यक्षिक पूर्ण नसतानादेखील अंतर्गत गुण कमी पडतात या कारणास्तव सढळ हाताने गुण द्यावे लागतात. या विषयीची मते.

| अ.नं. | मत | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णत: सहमत | 4 | 28.57 |
| 2. | सहमत | 3 | 21.42. |
| 3. | सांगता येत नाही | | |
| 4. | असहमत | 4 | 28.57 |
| 5. | पूर्णत: असहमत | 3 | 21.42 |

प्रात्यक्षिक पूर्ण नसतानादेखील अंतर्गत गुण कमी पडतात या कारणास्तव सढळ हाताने गुणदान करावे लागते " या विधानाशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक पूर्णत: सहमत, 21.42 प्रतिशत प्राध्यापक सहमत तर 28.57 प्रतिशत प्राध्यापक असहमत व 21.42 प्रतिशत प्राध्यापक पूर्णत: असहमत असल्याचे दिसते.

सूक्ष्म अध्यापन :

शिक्षकाच्या अंगी विविध कौशल्ये विकसित व्हावीत हा सूक्ष्म अध्यापनाचा मुख्य हेतू आहे. त्याकरिता अभिरूपता वापरली जाते. या सूक्ष्म पाठांचे निरीक्षण करण्यासाठी निरीक्षण नोंदपत्रिका विद्यार्थ्यांना दिली जाते. तिचा दर्जा कसा आहे हे कोष्टक 60 वरून दिसून येईल.

कोष्टक 60

निरीक्षण नोंदपत्रिकेचा दर्जा

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | नोंद पत्रक योग्य आहे. | 10 | 71.43 |
| 2. | नोंद पत्रक योग्य नाही. | 2 | 14.29 |
| 3. | उत्तर नाही | 2 | 14.43 |
| | एकूण | 14 | 100 |

सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमात दिलेल्या निरीक्षण नोंदपत्रकाची योग्यता कितपत आहे यासंबंधी बहुसंख्य ( 71.43 प्रतिशत ) प्राध्यापक नोंदपत्रिका योग्य असल्याचा निर्वाळा देतात तर 14.29 प्रतिशत प्राध्यापक नोंदपत्रिका योग्य नाही असे मत व्यक्त करतात. उत्तर न देणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाणही तितकेच ( 14.29 प्रतिशत ) आढळले.

कौशल्याचे निदान :

सूक्ष्म अध्यापनासाठी निवडलेल्या कौशल्यांचे निदान करण्याची पद्धती योग्य आहे असे प्रतिशत शंभर प्राध्यापक कळवितात. परंतु कौशल्यांचे निदान करण्याची पद्धती योग्य का आहे याची कारणे कोष्टक 61 मधून दृगोचर होतात.

कोष्टक 61

कौशल्याचे निदान करण्याची पद्धती योग्य का असण्याची कारणे.

| अ.नं. | कारणे | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | प्रथम अध्यापन नंतर निदान होते. | 4 | 28.57 |
| 2. | विद्यार्थी चांगल्या प्रकारे निदान करतो | 1 | 7.14 |
| 3. | टेपरेकॉर्डर व निरीक्षण सूचीच्या साहयाने | 3 | 21.42 |
| 4. | मूल्यांचे निदान | 2 | 14.29 |
| 5. | घटक कौशल्ये व वेळेचे नियोजन दिले आहे. | 1 | 7.14 |
| 6. | उत्तर नाही | 3 | 21.42 |
| | एकूण | 14 | 100 |

कौशल्यांची निदान करण्याची पद्धती योग्य असणा-या कारणांमध्ये प्रथम अध्यापन व नंतर निदान ( 28.57 प्रतिशत ) टेपरेकॉर्डर व निरीक्षणसूचीच्या साहाय्याने निदान ( 21.42 प्रतिशत ) ही प्रमुख कारणे आढळतात. तर इतर कारणांमध्ये मूल्यांचे निदान ( 14.29 प्रतिशत ) व विद्यार्थी चांगल्या प्रकारे निदान करतो ( 7.14 प्रतिशत ) तसेच घटककौशल्ये व वेळेचे नियोजन दिलेले आहे. ( 7.14 प्रतिशत ) यांचा समावेश आहे. उत्तर न देण्यास 21.42 प्रतिशत प्राध्यापक उदासीन आढळले.

प्रत्याभरण :

विद्यार्थ्यांमध्ये चांगली कौशल्ये विकसित होण्यासाठी त्यांना वेळच्या वेळी प्रत्याभरण देणे हे सूक्ष्म अध्यापन कृतीसत्रात प्राध्यापकांचे प्रमुख कार्य असते. हे प्रत्याभरण चांगले होण्यासाठी प्राध्यापकांनी सुचविलेले उपाय कोष्टक 62 दर्शविते.

कोष्टक 62

प्रत्याभरण चांगले होण्यासाठी सुचविलेले उपाय

| अ.नं. | उपाय | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | सुधारणा होईपर्यंत पूर्ण अध्यापन | 2 | 14.29 |
| 2. | गुणदोषांचे योग्य मूल्यमापन | 1 | 7.14 |
| 3. | प्रशिक्षणार्थीस कृती जमत नसल्यास ती स्वतः करून दाखवावी. | 2 | 14.29 |
| 4. | योग्य त्या सूचनांची स्पष्ट नोंद करावी. | 2 | 14.29 |
| 5. | पुर्नअध्यापनाच्या सूचनांचे पालन होते का ते पहावे. | 2 | 14.29 |
| 6. | निरीक्षण तक्त्यावरील मुद्दे कमी करावेत. | 1 | 7.14 |
| 7. | आत्माविष्कारास बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. | 1 | 7.14 |
| 8. | उणीवा सांगून त्या टाळावयास लावणे व जास्त निरीक्षकांना संधी देणे. | 3 | 21.42 |
| | एकूण | 14 | 100 |

प्रत्याभरण चांगले होण्यासाठी सुचविलेल्या उपायांमध्ये उणीवा सांगून त्या टाळावयास लावणे व जास्त निरीक्षकांना संधी देणे हा उपाय 21.42 प्रतिशत प्राध्यापक सुचवितात तर इतर उपायांमध्ये सुधारणा होईपर्यंत मूल्यमापन, स्वतः कृती करून दाखविणे, योग्य त्या सूचनांची नोंद, पुर्नअध्यापनाच्या सूचनांचे पालन होते का ते पाहणे हे चारही उपाय सुचविणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण सारखेच म्हणजे 14.29 प्रतिशत आहे.

गुणदोषांचे योग्य मूल्यमापन, निरीक्षण तक्त्यावरील मुद्दे कमी करावेत व आत्माविष्कारास बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी हे मुद्दे सुचविणारे प्राध्यापकही सारख्याच प्रतिशत प्रमाणात म्हणजे 7.14 प्रतिशत आढळले.

अध्यापन - पुनराध्यापन

कौशल्यप्राप्तीसाठी अध्यापन - पुनराध्यापन - पुर्नपुर्नअध्यापन याची गरज असते. परंतु सद्यस्थितीमध्ये ही आवृत्ती होत किंवा नाही यासंबंधीच्या मतांचे विश्लेषण कोष्टक 63 करते.

कोष्टक 63

अध्यापन - पुनराध्यापन सत्राची आवृत्ती

| अ.नं. | मत | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णतः सहमत | 4 | 28.57 |
| 2. | सहमत | 7 | 50 |
| 3. | सांगता येत नाही | | |
| 4. | असहमत | 3 | 21.42 |
| 5. | पूर्णतः असहमत | | |
| | एकूण | 14 | 100 |

" सूक्ष्म अध्यापन पाठात, अध्यापन - पुनराध्यापन सत्राची कौशल्य मिळेपर्यंत आवृत्ती होत नाही. " या विधानाबाबत 28.57 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः सहमत, पन्नास प्रतिशत प्राध्यापक सहमत तर 21.42 प्रतिशत प्राध्यापक असहमत आहेत.

सूक्ष्म अध्यापन कौशल्य :

सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचे सूक्ष्मपणे मूल्यमापन करणे हा कृत्रिसत्राचा मुख्य हेतू असतो. परंतु हे मुल्यमापन सूक्ष्मपणे होते किंवा नाही हे कोष्टक 64 मधून स्पष्ट होईल.

कोष्टक 64

सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचे सूक्ष्म मूल्मामापन

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णतः सहमत | 4 | 28.57 |
| 2. | सहमत | 6 | 42.86 |
| 3. | सांगता येत नाही. | | |
| 4. | असहमत | 2 | 14.29 |
| 5. | पूर्णतः असहमत | 1 | 7.14 |

" सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचे सूक्ष्मपणे मूल्यमापन न झाल्याने सूक्ष्म अध्यापनाचा हेतू साध्य होत नाही " या विधानाशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः सहमत, 42.86 प्रतिशत प्राध्यापक सहमत आहेत. या विधानाशी 14.29 प्रतिशत प्राध्यापक असहमत तर 7.14 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः असहमती दर्शवितात.

सरावपाठ :

सरावपाठ हा शिक्षक प्रशिक्षणाचा गाभा असतो. विद्यार्थी आणि शिक्षक यांची प्रत्यक्ष व घन आंतरक्रिया सरावपाठातून अपेक्षित असते. या सरावपाठाचे दिग्दर्शन शंभर प्रतिशत प्राध्यापक अध्यापन पद्धतीनुसार करतात. परंतु या सरावपाठांच्या मूल्यनापनाबाबत ते कितपत समाधानी आहेत हे कोष्टक 65 वरून दिसून येते.

कोष्टक 65

सरावपाठाच्या मूल्यमापनाबाबतची मते

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | मूल्यमापनाबाबत समाधानी | 5 | 35.71 |
| 2. | मूल्यमापनाबाबत असमाधानी | 8 | 57.14 |
| 3. | उत्तर नाही | 1 | 7.14 |
| | एकूण | 14 | 100 |

सरावपाठाच्या मूल्यमापनाबाबत 35.71 प्रतिशत प्राध्यापक समाधानी आहेत परंतु बहुसंख्य प्राध्यापक ( 57.14 प्रतिशत ) प्राध्यापक असमाधानी असलेले दिसून आले.

7.14 प्रतिशत प्राध्यापक उत्तर देण्यास उदासीन आढळले.

सरावपाठांचे मूल्यमापन :

सरावपाठांचे निरीक्षण वस्तुनिष्ठपणे होणे आवश्यक आहे. परंतु वस्तुनिष्ठ निरीक्षण होण्यासाठी प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यामध्ये आंतरक्रिया आवश्यक असते. तशी आंतरक्रिया घडून न आल्याने प्राध्यापक सरावपाठाच्या मूल्यमापनाबाबत असमाधानी आढळतात. या उणीवांचे विश्लेषण कोष्टक 66 मध्ये दिसून येईल.

कोष्टक 66

सरावपाठाच्या मूल्यमापनातील उणीवा

| अ.नं. | उणीवा | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | मार्गदर्शन व निरीक्षण योग्य नाही. | 3 | 21.42 |
| 2. | विद्यार्थ्यांची तयारी अपुरी असते. | 3 | 21.42 |
| 3. | विद्यार्थ्यांकडून सरावपाठ केवळ उरकला जातो. | 2 | 14.29 |
| 4. | एकाच पद्धतीचा वापर होतो. | 2 | 14.29 |
| 5. | आंतरक्रिया कमी | 3 | 21.42 |
| 6. | केंद्रावर केवळ दोन पाठ | 1 | 7.14 |
| | एकूण | 14 | 100 |

सरावपाठाच्या मूल्यमापनातील उणीवांमध्ये मार्गदर्शन व निरीक्षण योग्य नाही. तसेच विद्यार्थ्यांची तयारी अपुरी व आंतरक्रिया कमी आढळते असे प्रत्येकी 21.42 प्रतिशत प्रत्येकी उणीवांबाबत प्राध्यापक प्रकर्षाने जाणवतात तर सरावपाठ केवळ उरकला जातो व एकाच पद्धतीचा वापर होतो या दोन्ही उणीवांबाबत तितक्याच प्रमाणात ( 14.29 प्रतिशत ) प्राध्यापकांनी दर्शविल्या आहेत. केंद्रावर केवळ दोन पाठ अशीही उणीव 7.14 प्रतिशत प्राध्यापकांनी निदर्शनास आणला आहे.

सरावपाठाच्या मूल्यमापनासाठी दर्जेदार उपाय :

सरावपाठांचे मूल्यमापन दर्जेदार होण्यासाठी काही तांत्रिक बाबी पूर्ण करणे गरजेचे असते. त्यामध्ये वेळेत मार्गदर्शन, अध्यापन पद्धतीनुसार पाठनिरीक्षण इ. चा समावेश होतो. या संदर्भात प्राध्यापकांनी सुचविलेल्या दर्जेदार उपायांचे विश्लेषण कोष्टक 67 मध्ये केले आहे.

कोष्टक 67

सरावपाठाचे मूल्यमापनबाबत सुचविलेले उपाय

| अ.नं. | उपाय | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | केंद्राकडे निम्मे सरावपाठ असावेत. | 1 | 7.14 |
| 2. | सरावपाठ योग्य होईपर्यंत प्रत्याभरण | 2 | 14.29 |
| 3. | अध्यापन पद्धतीनुसार पाठनिरीक्षण करावयास मिळावे. | 4 | 28.57 |
| 4. | समक्ष मार्गदर्शन घ्यावे. | 4 | 28.57 |
| 5. | पद्धतींचा योग्य वापर करावा. | 3 | 21.42 |
| | एकूण | 14 | 100 |

सरावपाठाच्या मूल्यमापनाबाबत, अध्यापन पद्धतीनुसार पाठनिरीक्षण करावयास मिळावे व समक्ष मार्गदर्शन घ्यावे या दोन्ही उपायांबाबत प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण सारखेच ( 28.57 ) तर पद्धतीचा योग्य वापर करावा असे 21.42 प्रतिशत प्राध्यापकांनी सुचविले आहे. त्याचबरोबर केंद्राकडे निम्मे सरावपाठ हवेत असे प्रतिशत 7.14 प्राध्यापकांनी व सरावपाठ योग्य होईपर्यंत प्रत्याभरण हा उपाय 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी सुचविला आहे.

सरावपाठांची अंतिम निष्पत्ती :

प्रत्येक सरावपाठाच्या मूल्यमापनातून विद्यार्थ्यांना पुरेसे प्रत्याभरण मिळणे गरजेचे असते. यामुळे अध्यापनामध्ये टप्प्याटप्प्याने प्रगती होत जाते. त्यामुळे प्रथम पाठापेक्षा शेवटचा पाठ हा निश्चितच दर्जेदार असतो. परंतु याबाबतची सत्यस्थिती कोष्टक 68 वरून दिसून येईल.

कोष्टक 68

सरावपाठाच्या अंतिम निष्पत्तीबाबतची मते

| अ.नं | मते | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णतः सहमती | 2 | 14.29 |
| 2. | सहमत | 3 | 21.42 |
| 3. | सांगता येत नाही. | | |
| 4. | असहमत | 4 | 28.57 |
| 5. | पूर्णतः असहमत | 5 | 35.71 |
| 6. | उत्तर नाही | | |
| | एकूण | 14 | 100 |

पहिला पाठ व शेवटचा पाठ यात फरक नसतो या विधानाशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक असहमत असतात तर 35.71 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः असहमत आहेत. तर पूर्णतः सहमती 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी व सहमती 21.42 प्राध्यापकांनी दाखविली आहे.

दर्जेदार सरावपाठासाठी उपाय :

दर्जेदार पाठ हा झालेल्या सरावांचा उत्तम नमुना असून प्राध्यापकांनी सरावपाठ दर्जेदार होण्यासाठी त्यांना आलेल्या अनुभवाच्या आधारे काही उपाय सुचविले आहेत. त्यांचे विश्लेषण कोष्टक 69 मध्ये केलेले आहे.

कोष्टक 69

सरावपाठ दर्जेदार होण्यासाठी सुचविलेले उपाय

| अ.नं. | उपाय | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पाठनिरीक्षक योग्य नेमावेत. | 4 | 28.57 |
| 2. | पूर्ण तयारी झाल्यानंतरच पाठाची परवानगी | 2 | 14.29 |
| 3. | विद्यार्थ्यांना संदर्भ पुस्तकांचा आधार घेण्यास प्रवृत्त करावे. | 1 | 7.14 |
| 4. | योग्य पाठनिरीक्षण, योग्य मूल्यमापन व मार्गदर्शन | 2 | 14.29 |
| 5. | प्रत्येक महिन्यात ठराविक पाठ घेण्याची योजना असावी. | 1 | 7.14 |
| 6. | अधिक प्रश्नांद्वारे कृतियुक्त सहभाग घ्यावा. | 1 | 7.14 |
| 7. | शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर करावा. | 1 | 7.14 |
| 7. | वर्गनियंत्रण चांगले हवे. | 2 | 14.29 |
| | एकूण | 14 | 100 |

पाठनिरीक्षक योग्य नेमावेत ( 28.57 प्रतिशत ), सरावपाठ दर्जेदार व्हावेत यासाठी पूर्ण तयारी झाल्यावरच पाठाची परवानगी व योग्य पाठनिरीक्षण, योग्य मूल्यमापन व मार्गदर्शन या दोन्ही उपायांबाबत सारख्याच प्रमाणात ( प्रतिशत 14.29 ) प्राध्यापकांनी आपले मत नोंदविले आहे. विद्यार्थ्यांना संदर्भ पुस्तकांचा आधार घेण्यास प्रवृत्त करावे, प्रत्येक महिन्यात ठराविक पाठ घेण्याची योजना असावी, अधिक प्रश्नांद्वारे कृतियुक्त सहभाग घ्यावा व शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर करावा या चारही उपायांबाबतचे प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण सारखेच म्हणजे 7.14 प्रतिशत आहे तर वर्गनियंत्रण चांगले हवे असे 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी सुचविले आहे.

**सहाध्यायी** . पर्यवेक्षित सरावपाठ :

अभ्यासक्रमात सरावपाठांच्या जोडीला प्राध्यापकांबरोबरच प्रशिक्षणार्थींना एकमेकांचे मार्गदर्शन मिळावे म्हणून **सहाध्यायी** सरावपाठांचे आयोजन असते. हे सरावपाठ दर्जेदार व्हावेत यासाठी सुचविलेले उपाय कोष्टक 70 मध्ये नमूद केले आहेत.

कोष्टक 70

**सहाध्यायी** पर्यवेक्षित सरावपाठामधील सुधारणा

| अ.नं. | मत | प्रतिसादकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पाठ पाहताना **सहाध्यायांचे** विषय समान असावेत. इतर विषयांचे पाहण्यासाठी आणखी एखादा **सहाध्यायाची** कार्यवाही योग्य प्रकारे व्हावी. | 4 | 28.57 |
| 2. | निःपक्षपातीपणे निरीक्षण करून सूचना कराव्यात. ( कटुता स्वीकारण्याची तयारी नसते. ) प्रशिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे. | 10 | 71.42 |
| | एकूण | 14 | 100 |

**सहाध्यायी** पर्यवेक्षित सरावपाठाबाबत निःपक्षपातीपणे निरीक्षण करून सूचना कराव्यात व प्रशिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे असे बहुसंख्य ( 71.42 प्रतिशत ) प्राध्यापक सुचवितात तर पाठ पाहताना **सहाध्यायांचे** विषय समान असावेत व इतर विषयांचे पाठ पाहण्यासाठी आणखी एखाद्या साहाध्यायाची कार्यवाही योग्य प्रकारे व्हावी असे 28.57 प्रतिशत प्राध्यापक नोंदवितात.

सहशालेय उपक्रम :

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहशालेय उपक्रम हे अध्यापनाइतकेच महत्वाचे आहेत. त्यासाठी शिक्षक तसा घडावा लागतो. यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे अशीच योजना असते. सहभागी न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापनाची पद्धती खालील कोष्टकात नमूद केली आहे.

कोष्टक 71

सहशालेय उपक्रमांमध्ये सहभागी न झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाची पद्धत

| अ.नं. | मूल्यमापनाचे साधन | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पुन्हा सहभागी करून | 4 | 28.57 |
| 2. | ढोबळमानाने | 2 | 14.29 |
| 3. | अत्यल्प गुण | 2 | 14.29 |
| 4. | उत्तर नाही | 6 | 42.86 |
| | एकूण | 14 | 100 |

सहशालेय उपक्रम सहभागात न झालेल्या विद्यार्थ्यांना 28.57 प्रतिशत प्राध्यापक पुन्हा सहभागी करून मूल्यमापन होते, 14.29 प्रतिशत प्राध्यापक ढोबळमानाने गुणदान तर तितकेच प्राध्यापक अत्यल्प गुण देतात. तसेच 42.86 प्रतिशत प्राध्यापकांनी उत्तर दिले नाही.

विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार मूल्यमापन

विद्यार्थ्यांची गुणवत्ता त्यांच्या मूल्यमापनानंतरच प्रतिबिंबित होते. त्याची गुणवत्ता व केलेले मूल्यमापन यात फरक पडत नाही. हे खालील कोष्टकावरून दिसून येते.

कोष्टक 72

विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार मूल्यमापन

| अ.नं. | गुणवत्तेतील फरकाबाबत मते | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | फरक असतो. | 2 | 14.29 |
| 2. | फरक नसतो. | 12 | 85.81 |
| | एकूण | 14 | 100 |

विद्यार्थ्यांची गुणवत्ता व केलेले मूल्यमापन यात फरक असतो. या विधानाबाबतच्या मतांमध्ये 14.29 प्रतिशत प्राध्यापकांचे मत अनुकूल आढळले तर बहुसंख्य प्राध्यापक ( प्रतिशत 85.81 ) गुणवत्ता व मूल्यमापन यात फरक नसतो अशा प्रतिकूल मताचे दिसून आले.

समाजसेवा :

विद्यार्थ्यांचे सामाजीकरण होण्यासाठी समाजसेवा हा उपक्रम असतो. यातून श्रमाचे मूल्य जोपासले जाते. म्हणून हा उपक्रम राबवून त्यातून मूल्यांकन केले जाते. हे मूल्यांकन कोणत्या पद्धतीने केले जाते हे कोष्टक 73 मध्ये नमूद केले आहे.

कोष्टक 73

समाजसेवा प्रात्यक्षिकास गुण देण्याची पद्धती

| अ.नं | पद्धती | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | काम चालू असताना | 8 | 57.14 |
| 2. | नंतर ( सवडीने ) | 5 | 35.17 |
| 3. | उत्तर नाही | 1 | 7.14 |
| | एकूण | 14 | 100 |

समाजसेवा या प्रात्यक्षिकास बहुसंख्य प्राध्यापक ( 57.14 प्रतिशत ) काम चालू अस्ताना गुण देतात तर 35.17 प्रतिशत प्राध्यापक सवडीने गुण देतात असे दिसून आले. 7.14 प्रतिशत प्राध्यापक उत्तर देण्यास उदासीन आहेत.

समाजसेवेचे मूल्यमापन :

समाजसेवेचे कार्यक्रम व त्यांचे होणारे मूल्यमापन यात तारतम्य नसते. या विधानाशी सहमती बाबतची मते खालील कोष्टकात दिसून येतात.

कोष्टक 74

समाजसेवा कार्यक्रम व त्याचे होणारे मूल्यमापन यात तारतम्य नसते या विधानाशी संमती.

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णतः सहमत | 4 | 28.57 |
| 2. | सहमत | | |
| 3. | सांगता येत नाही | | |
| 4. | असहमत | 5 | 35.71 |
| 5. | पूर्णतः असहमत | 14 | 100 |
| | एकूण | 14 | 100 |

समाजसेवा कार्यक्रम व त्याचे होणारे मूल्यमापन यात तारतम्य नसते या विधानाशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः सहमत आहेत. तर पूर्णतः असहमत व असहमत प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण समान ( 35.71 प्रतिशत ) आहे.

कार्यानुभव :

विद्यार्थ्यांच्या अध्ययनाबरोबर त्यांची व्यावसायिकता वाढवणे या उपक्रमात विविध प्रात्यक्षिकांचा समावेश असून त्याचा अहवाल लिहावा लागतो. अहवालात साम्य असल्यास त्याचा गुणावर कोणता परिणाम होतो हे खालील कोष्टक 75 मधून स्पष्ट होईल.

कोष्टक 75

कार्यानुभव अहवालातील साम्याचा विद्यार्थ्यांच्या गुणावर होणारा परिणाम

| अ.नं. | परिणाम | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | गुणावर परिणान होतो. | 8 | 57.14 |
| 2. | गुणावर परिणान होत नाही | 6 | 42.86 |
| | एकूण | 14 | 100 |

कार्यानुभव अहवालातील साम्याचा विद्यार्थ्यांच्या गुणावर परिणाम होतो असे बहुसंख्य प्राध्यापक ( 57.14 प्रतिशत ) म्हणतात तर गुणावर परिणाम होत नाही असे 42.86 प्रतिशत प्राध्यापकांचे म्हणणे आहे.

स्वाध्यायाचे प्रत्याभरण :

अध्यापनात सुधारणा व त्याची यशस्विता योग्य प्रत्याभरणावर आहे. म्हणून स्वाध्याय तपासून त्यांना प्रत्याभरण देणे गरजेचे असते. असे प्रत्याभरण दिले जाते किंवा नाही याबाबतची मते खाली दिली आहेत.

कोष्टक 76

स्वाध्यायाचे प्रत्याभरण

| अ.नं. | गुणदोष | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | विद्यार्थ्यांना कल्पना दिली जाते. | 9 | 64.23 |
| 2. | विद्यार्थ्यांना कल्पना दिली जात नाही. | 4 | 28.57 |
| 3. | उत्तर नाही | 1 | 7.14 |
| | एकूण | 14 | 100 |

स्वाध्यायांच्या गुणदोषांची माहिती दिली जाते असे बहुसंख्य प्राध्यापक ( 64.23 प्रतिशत ) म्हणतात व विद्यार्थ्यांना कल्पना दिली जात नाही असे 28.57 प्रतिशत प्राध्यापकांचे मत आहे. उत्तर न देणा-यांचे प्रमाण 7.14 प्रतिशत आहे.

स्वाध्याय गुणदान :

विद्यार्थ्यांकडून स्वाध्याय लिहून घेऊन त्यांना गुणदान केले जाते. हे गुण भरमसाट दिले जातात या मताची सहमती खालील कोष्टकात नमूद केली आहे.

कोष्टक 77

स्वाध्यायास दिल्या जाणा-या गुणाबाबतची मते

| अ.नं. | गुण भरमसाट असतात या मताशी सहमती | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णतः सहमत | – | – |
| 2. | सहमत | 1 | 7.14 |
| 3. | सांगता येत नाही | 2 | 14.29 |
| 4. | असहमत | 7 | 50.00 |
| 5. | पूर्णतः असहमत | 4 | 28.57 |
| | एकूण | 14 | 100 |

स्वाध्यायास भरमसाट गुण असतात या मताशी पूर्णतः सहमत कोणीही नाही. सहमत असणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 7.14 असून सांगता येत नाही असे मत व्यक्त करणारे 14.29 प्रतिशत, असहमत असणारे पन्नास प्रतिशत व पूर्णतः असहमत असणारे 28.57 प्राध्यापक आढळले.

स्वाध्यायामुळे वार्षिक परीक्षेवर होणारा परिणाम :

स्वाध्याय देण्यापाठीमागचा हेतू प्रशिक्षणार्थींचा अधिक अध्ययन सराव व्हावा हा असतो. याचा उपयोग त्यांना वार्षिक परीक्षेसाठी होतो किंवा नाही या बाबतचे मत कोष्टक 78 मध्ये दिले आहे.

कोष्टक 78

स्वाध्यायामुळे विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेवर होणारा परिणाम

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णतः सहमत | 2 | 14.29 |
| 2. | सहमत | 2 | 14.29 |
| 3. | सांगता येत नाही | 3 | 21.42 |
| 4. | असहमत | 4 | 28.57 |
| 5. | पूर्णतः असहमत | 3 | 21.42 |
| | एकूण | 14 | 21.42 |

स्वाध्यायामुळे विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेवर परिणाम होतो या मताशी पूर्णतः सहमत व सहमत प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण सारखेच म्हणजे 14.29 प्रतिशत असे आहे. तर असहमत असणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 28.57 आहे तर पूर्णतः असहमत व निश्चित मत न देऊ शकणा-या प्राध्यापकांचे प्रमाणही सारखेच म्हणजे 21.42 प्रतिशत आहे.

विद्यार्थी शिक्षकांचे दोन पाठांचे मूल्यमापन :

शिक्षकांच्या ठिकाणी विकसित झालेल्या अध्यापकाच्या कौशल्याचे मूल्यमापन वार्षिक परीक्षेसाठी घेतल्या जाणा-या केवळ दोन पाठांवरूनच केले जाते. या संबंधीची मते कोष्टक 79 मध्ये दिली आहेत.

कोष्टक 79

केवळ दोन पाठांवरून विद्यार्थी शिक्षकांचे मूल्यमापन, याबाबतची प्राध्यापकांची मते

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णत: सहमत | 2 | 14.29 |
| 2. | सहमत | 9 | 64.28 |
| 3. | सांगता येत नाही. | 1 | 7.14 |
| 4. | असहमत | 2 | 14.29 |
| 5. | पूर्णत: असहमत | | |
| 6. | उत्तर नाही | | |
| | एकूण | 14 | 100 |

केवळ दोन पाठावरून विद्यार्थी शिक्षकाचे मूल्यमापन होणे योग्य नाही. या मताशी बहुसंख्य प्राध्यानक ( 64.28 प्रतिशत ) सहमत आहेत. पूर्णत: सहमत व असहमत प्राध्यापकांचे मत सारख्याच प्रमाणात ( 14.29 प्रतिशत ) प्राध्यापकांनी मांडले आहे. सांगता येत नाही असे अत्यल्प प्राध्यापक ( 7.14 प्रतिशत ) प्राध्यापकांचे मत आहे.

वार्षिक पाठ :

मुंबई विद्यापीठात सराव पाठांचे मूल्यमापन वर्षभर होणा-या सरावपाठांमधूनच केले जाते. अशाच प्रकारची पद्धत मुक्त विद्यापीठात असावी का ? याबाबतची मते कोष्टक 80 मध्ये दिली आहेत.

कोष्टक 80

" मुंबई विद्यापीठाप्रमाणे वार्षिक पाठ रद्द करावेत " या विधानाशी सहमती.

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | होय | 4 | 28.57 |
| 2. | नाही | 9 | 64.28 |
| 3. | उत्तर नाही | 1 | 7.14 |
| | एकूण | 14 | 100 |

मुक्त विद्यापीठाचे वार्षिक पाठ मुंबई विद्यापीठाप्रमाणे रद्द करावेत या मताशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक सहमती दर्शवितात तर बहुसंख्या प्राध्यापक ( प्रतिशत 64.28) असहमती दर्शवितात. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रमाण अत्यल्प ( 7.14 प्रतिशत) आहे.

क्षमताधिष्ठित शिक्षक प्रशिक्षण :

शिक्षकाजवळ काही किमान क्षमता असाव्या लागतात व या किमान क्षमतांचे मूल्यमापन केले गेले पाहिजे. असे मूल्यमापन केले जाते किंवा नाही या संबंधीचे प्राध्यापकांचे मत कोष्टक 81 मध्ये दिले आहे.

कोष्टक 81

क्षमताधिष्ठित शिक्षक प्रशिक्षणाच्या संकल्पनेच्या राबवणुकीबाबतची मते

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पूर्णतः असहमत | 7 | 50 |
| 2. | सहमत | 3 | 21.42 |
| 3. | सांगता येत नाही | 1 | 7.14 |
| 4. | असहमत | 1 | 7.14 |
| 5. | पूर्णतः असहमत | 2 | 14.29 |
| | एकूण | 14 | 100 |

क्षमताधिष्ठित शिक्षक प्रशिक्षणाच्या संकल्पनेच्या राबवणुकीबाबत पन्नास प्रतिशत म्हणजे निम्मे प्राध्यापक पूर्णतः सहमत आहेत तर 21.42 प्रतिशत प्राध्यापक सहमत आहेत. पूर्णतः असहमत असलेल्या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 14.29 तर 7.14 प्रतिशत प्राध्यापक असहमत आहेत.

मुक्त विद्यापीठाच्या कामाचा दैनंदिन कामावर होणारा परिणाम :

मुक्त विद्यापीठाचे कामकाज सुट्टीत असल्याने प्राध्यापकांना सुट्टी मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होतो. याबाबतची मते कोष्टक 82 मध्ये नमूद केली आहेत.

कोष्टक 82

वर्षातील दैनंदिन कामावर सुट्टीतीली मुक्त विद्यापीठाच्या कामाचा होणारा परिणाम

| अ.नं. | मत | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | प्रतिकूल परिणाम होतो. | 8 | 57.14 |
| 2. | प्रतिकूल परिणाम होत नाही. | 5 | 35.71 |
| 3. | उत्तर नाही | 1 | 7.14 |
| | एकूण | 14 | 100 |

वर्षातील दैनंदिन कामाचा सुट्टीतील मुक्त विद्यापीठाच्या कामावर होणारा परिणाम प्रतिकूल असतो असे मत 57.14 प्रतिशत म्हणजे बहुसंख्य प्राध्यापकांचे मत आहे. तर 35.71 प्रतिशत प्राध्यापकांचे परिणाम होत नाही असे मत आहे. उत्तर न देणा-यांचे प्रमाण प्रतिशत 7.14 इतके आहे.

पर्यायी योजना :

सुट्टीतील कामाचा दैनंदिन कामावर परिणाम होत असल्याने प्राध्यापकांनी सुचविलेल्या पर्यायी योजनांची माहिती कोष्टक 83 मध्ये दिली आहे.

कोष्टक 83

कामावरील विपरित परिणाम टाळण्यासाठी पर्यायी योजना

| अ.नं. | पर्याय | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | सेवानिवृत्त लोक नेमावेत. | 2 | 14.29 |
| 2. | वेगळा नवीन अध्यापक वर्ग नेमावा. | 2 | 14.29 |
| 3. | विद्यापीठात अभ्यासक्रम घ्यावा. | 3 | 21.42 |
| 4. | पर्यायी रजा मिळावी | 3 | 21.42 |
| 5. | मानधन वाढवावे. | 2 | 14.29 |
| 6. | प्रशिक्षण कालावधी वाढवावा. | 1 | 7.14 |
| 7. | कोर्सेस बंद करावेत | 1 | 7.14 |
| | एकूण | 14 | 100 |

मुक्त विद्यापीठाच्या कामावरील विपरित परिणाम टाळण्यासाठी प्राध्यापकांनी सुचविलेल्या उपायांमध्ये विद्यापीठात अभ्यासक्रम घ्यावा व पर्यायी रजा मिळाव्यात हे उपाय सुचविणारे प्राध्यापक प्रतिशत 21.42 आढळले तर सेवानिवृत्त लोक नेमावेत, वेगळा नवीन अध्यापक वर्ग नेमावा व मानधन वाढवावे हे उपाय 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी सुचविले आहेत. प्रशिक्षण कालावधी वाढवावा व कोर्सेस बंद करावेत असेही 7.14 प्रतिशत प्राध्यापकांनी सुचविले आहे.

दर्जेदार उपाय :

मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम अधिक परिणामकारक रीतिने राबविण्याकरिता प्राध्यापकांनी सुचविलेले दर्जेदार उपाय कोष्टक 84 मध्ये दिलेले आहेत.

कोष्टक 84 - मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम अधिक परिणामकारक रीतिने राबवण्याकरिता दर्जेदार उपाय

| अ.नं. | उपाय | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | केंद्रावरील अडचणी जाणून त्या सोडवाव्यात | 1 | 7.14 |
| 2. | संपर्कसत्राचा कालावधी अधिक हवा. ( वाढवावा ) | 6 | 42.85 |
| 3. | मुक्त विद्यापीठाच्या प्रशासकीय यंत्रणेचे निरीक्षण, नियंत्रण व मार्गदर्शन व्हावे. | 7 | 50 |
| 4. | मार्गदर्शक पुस्तिका सविस्तर व वेळेत द्याव्यात. | 5 | 35.71 |
| 5. | अकार्यक्षम केंद्रे बंद करावीत. | 3 | 21.42 |
| 6. | विभागीय केंद्रे असावीत. | 3 | 21.42 |
| 7. | विद्यापीठातच कोर्स करावा. | 1 | 7.14 |
| 8. | प्राध्यापकांचे मानधन वाढवावे. | 14 | 100 |
| 9. | अभ्यासक्रम तज्ज्ञांच्या साहाय्याने तयार करावा. | 1 | 7.14 |
| 10. | प्रात्यक्षिकांमध्ये विविधता असावी. | 2 | 14.29 |
| 11. | विद्यार्थी शिक्षकांमध्ये जाणीव जागृती करावी. | 1 | 7.14 |

मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम अधिक परिणामकारक रीतिने राबविण्याकरिता सुचविलेल्या दर्जेदार उपायांमध्ये प्राध्यापकांचे मानधन वाढवावे ( प्रतिश 100 ) असा उपाय सर्वच प्राध्यापकांनी सुचविला आहे. मुक्त विद्यापीठाच्या प्रशासकीय यंत्रणेचे निरीक्षण, नियंत्रण व मार्गदर्शन व्हावे असे प्रतिशत पन्नास प्राध्यापकांनी सुचविले आहे. मार्गदर्शक पुस्तिका वेळेवर उपलब्ध करून देण्यात याव्यात हीसुद्धा एक दर्जेदार व महत्वाची सूचना प्रतिशत 35.71 प्राध्यापकांनी केली आहे तर संपर्कसत्राचा कालावधी वाढवावा असे 42.85 प्रतिशत प्राध्यापकांनी सुचविले आहे. इतर उपायांमध्ये अकार्यक्षम केंद्रे बंद करावीत असे 21.42 प्रतिशत प्राध्यापकांना सुचवावेसे वाटते. विभागीय केंद्रे असावीत असेही तितक्याच प्रमाणातील प्राध्यापकांना वाटते. प्रात्यक्षिकांमध्येही विविधता असावी असा उपाय प्रतिशत 21.42 प्राध्यापकानी सुचविला आहे. वरील सर्व उपाय हे प्रामुख्याने दिले आहेत.

प्रशिक्षण कार्यक्रमातील उणीवा.

मुक्त विद्यापीठाच्या बी. एड्. प्रशिक्षण कार्यक्रमात प्राध्यापकांना जाणविणा-या उणीवा कोष्टक 85 मध्ये दिल्या आहेत.

कोष्टक 85

मुक्त विद्यापीठाच्या बी. एड्. प्रशिक्षण कार्यक्रमातील उणीवाबाबत मते.

| अ.नं. | मते | प्रतिसादक संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | कालावधी कमी | 5 | 35.71 |
| 2. | स्रावपाठांना महत्व असणे | 2 | 14.29 |
| 3. | मार्गदर्शक पुस्तिका वेळेवर उपलब्ध होत नाहीत. | 2 | 14.29 |
| 4. | विद्यापीठाकडून नियंत्रण फार कमी प्रमाणात होते. | 1 | 7.14 |
| 5. | स्राव पाठांची संख्या कमी | 1 | 7.14 |
| 6. | प्रशिक्षणार्थींना उद्बोधन नाही. | 1 | 7.14 |
| 7. | प्रशिक्षण कालावधी व्यतिरिक्त विद्यार्थी निष्क्रिय असतात. | 1 | 7.14 |
| 8. | कॉपी - राईटिंग प्रात्यक्षिकाबाबत घडते. | 2 | 14.29 |
| 9. | मूल्यांकन निर्दोष नसते. | 1 | 7.14 |
| 10. | अधिका-यांच्या भेटीचा अभाव | 2 | 14.29 |
| 11. | स्वयंअध्ययन व स्वयंमूल्यांकन यावरच जास्त भर असल्यामुळे प्रशिक्षण दर्जेदार होतेच याची खात्री नसते. | 1 | 7.14 |
| 12. | उत्तर नाही. | 1 | 7.14 |

मुक्त विद्यापीठाच्या बी. एड्. प्रशिक्षण कार्यक्रमातील उणीवांमध्ये 35.71 प्रतिशत प्राध्यापकांच्या मते प्रशिक्षणाचा कालावधी कमी आहे तर सरावपाठांना महत्व असणे, मार्गदर्शक पुस्तिका वेळेवर उपलब्ध होत नाहीत, कॉपी - राईटिंग प्रात्यक्षिकाबाबत घडते व अधिका-यांच्या भेटीचा अभाव या चारही उणीवा प्रकर्षाने जाणवणा-या प्राध्यापकांचे प्रमाण सम असून ते प्रतिशत 14.29 आहे.

विद्यापीठाकडून नियंत्रण फार कमी प्रमाणात होते, सराव पाठांची संख्या कमी, प्रशिक्षणार्थींना उद्‌बोधन नाही, प्रशिक्षण कालावधी व्यतिरिक्त विद्यार्थी निष्क्रिय असतात, मूल्यांकन निर्दोष नसते तसेच स्वयंअध्ययन व स्वयंमूल्यांकन यावरच जास्त भर असल्यामुळे प्रशिक्षण दर्जेदार होतेच असे नसते या सहा उणीवा प्रत्येकी 7.14 प्रतिशत प्राध्यापकांनी नोंदविल्या आहेत. या सर्वच उणीवांचे प्रतिशत प्रमाण समान ( 7.14 ) इतके आहे. उत्तर न देणा-या प्रतिसादकांचे प्रमाणही तितकेच म्हणजे 7.14 प्रतिशत आहे.

मुलाखती :

मुलाखतीद्वारे केंद्रसंचालक, समन्वयक व प्रशिक्षणार्थींकडून मिळालेल्या माहितीचे पृथःकरण व विशदीकरण **केले.** प्रशिक्षणार्थींकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या. पण त्याची विश्वासार्हता पडताळून पाहण्यासाठी केंद्रसंचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य यांची मुलाखत घेतली. त्यांना भेटून त्यांच्याकडून वेळ निश्चित केली व त्याप्रमाणे त्यांची मुलाखत ' घेतली '. तसेच बी. एड्. शिक्षणक्रमाचे केंद्राचे समन्वयक यांच्याशी चर्चा करून वेळ निश्चित केली व त्यांची मोकळ्या वातावरणात मुलाखत घेतली. पंचवीस प्रतिशत विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. प्रश्नावलीत काही मुद्दे निसटले ते मुलाखतीमध्ये विचारले.

1. केंद्रसंचालक :

1. मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम राबविताना व्यवस्थापनास येणा-या अडचणी :

मुक्त विद्यापीठाचा सुट्टीतील बी. एड्. कोर्स महाविद्यालयात राबवत असताना बहुविध अडचणी निर्माण होतात. कोर्स सुट्टीत असल्याने प्राध्यापकांना प्रशासकीय सेवकांना विश्रांती मिळत नाही. त्यामुळे त्यांची काम करण्याची मानसिक तयारी नसते. त्यामुळे अभ्यासक्रम जास्त चांगल्या प्रकारे राबविता येत नाही.

कोर्स राबवित असताना मतभेद निर्माण होतात. जेवढे काम तेवढे मानधन मिळत नाही. शिवाय विद्यापीठाकडून येणा-या आदेशानुसार काम करावे लागते.

यामुळे शाखेवर ताण पडतो. कॉलेजमधील वातावरण बिघडते. लोकांच्यामध्ये गैरसमज निर्माण होतात. मानधनामुळे घोटाळे निर्माण होतात. विद्यापीठाच्या निरीक्षकाने येऊन बिले द्यावीत. संचालकांच्या मते ' विकत घेतलेले दुखणेच आहे, हा अभ्यासक्रम नसलेला परवडला. "

2. विद्यापीठामार्फत दिले जाणारे मानधन :

याबद्दल केंद्रसंचालकांना विचारले असता त्यांनी असे मत व्यक्त केले की, विद्यापीठ विद्यार्थ्यांच्याकडून रू.21.000/- घेते. पण प्रत्यक्षात महाविद्यालयाला प्रत्येक विद्यार्थ्यामागे रू.1,000/- देते. हे मानधन पुरेसे नाही. त्यामुळे प्रशासकीय सेवक काम करण्यास नाखूष असतात.

3. मुक्त विद्यापीठ बी. एड्. अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र स्टाफ :

संचालकांनी या अभ्यासक्रमासाठी मुक्त विद्यापीठाने स्टाफ नेमला जावा असे मत व्यक्त केले. त्याबरोबरच हे काम विद्यापीठानेच विद्यापीठात करावे. हा अभ्यासक्रम कोणत्याही कॉलेजकडे उदा. कॉमर्स, कॉलेज, आर्टस् कॉलेज इत्यादी ठिकाणी राबवण्यास देऊ नयेत, असेही ते म्हणाले.

मुक्त विद्यापीठ बी. एड्. शिक्षणक्रम व नियमित कोर्सबाबत विचारले असता संचालकांनी फरक स्पष्ट केला व तफावत असल्याचे सांगितले. ही तफावत पुढीलप्रमाणे आहे.

4. मुक्त विद्यापीठाचा बी. एड्. शिक्षणक्रम व नियमित बी. एड्. कोर्स यातील तफावत :

| नियमित अभ्यासक्रम | मुक्त विद्यापीठ अभ्यासक्रम. |
|---|---|
| सरावपाठ विविध शाळेत घेतले जातात. | सरावपाठ प्रशिक्षणार्थींच्या शाळेत घेतले जातात. |
| पाठ पाहण्यासाठी प्राध्यापक असतात. | प्रशिक्षणार्थींचे सहाध्यायी व शिक्षक पाठ पाहतात. |
| टयूटोरिअल्स घेतली जातात. | स्वाध्याय घरीच शिकून |
| सत्रपरीक्षा असते | सत्रपरीक्षा नसते. |
| प्रात्यक्षिक कामे व्यवस्थित घेतली जातात | प्रात्यक्षिक कानाचे मार्गदर्शन केले जाते व घरीच पूर्ण करतात. |

| नियमित अभ्यासक्रम | मुक्त विद्यापीठ अभ्यासक्रम |
|---|---|
| एक वर्षाचा बी. एड्. कालखंड | दोन वर्षाचा कालखंड |

अशा प्रकारे नियमित बी. एड्. शिक्षणक्रम व मुक्त विद्यापीठाचा बी. एड्. अभ्यासक्रम यामध्ये भरपूर तफावत असल्याचे निदर्शनास आणून दिले. मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी दुय्यम दर्जाचे वाटतात.

5. मुक्त विद्यापीठाच्या राबविल्या जाणा-या बी. एड्. अभ्यासक्रमाची कार्यवाही :

कार्यवाहीबाबत संचालकांना विचारले असता त्यांनी सुचविले की, विद्यापीठाने हा कोर्स स्वतंत्रपणे राबवावा. त्याचबरोबर कॉलेजना आदेश देण्याच्या भानगडीत पडू नये. कॉलेजला दोन मालक तयार होतात.

1. शिवाजी विद्यापीठ नियमित कोर्स
2. मुक्त विद्यापीठ

या दोघांचीही पत्रे येत राहतात. म्हणून स्वतंत्रपणे राबवायची व्यवस्था करावी. हे काम प्रशिक्षणाचे असल्याने विद्यार्थी व शिक्षक यांच्यात जवळीक असावी. म्हणून नियमित कोर्सच जास्त चांगला. या कोर्सबाबत विद्यापीठाची देखरेख नाही, भेटी नाहीत, मार्गदर्शन नाही. असे असू नये.

मुक्त विद्यापीठाचा बी. एड्. शिक्षणक्रमाचा कालावधी फारच कमी आहे. नियमित बी. एड्. कोर्सच्या 1/3 कालावधी उपलब्ध होतो. त्यामुळे केवळ कोर्स उरकण्याच्या किंवा संपविण्याच्या मागे असतो. हे व्यावसायिक शिक्षण असल्याने रोज मार्गदर्शन हवे.

6. बी. एड्. अभ्यासक्रमाचा दर्जा :

केंद्र संचालकांना या अभ्यासक्रमाच्या दर्जाबाबत विचारले असता मुक्त विद्यापीठाचा बी. एड्. शिक्षणक्रम पूर्ण करून बाहेर पडणारा विद्यार्थी पुरेसे मार्गदर्शन नसल्याने

साधारण दर्जा असलेला, ध्येय, धोरणे, वृत्तीत फरक नसलेला, फक्त उरकणे ही वृत्ती असलेला असा आहे. म्हणून शिक्षक प्रशिक्षण स्वस्त नको. व्यवस्थित घासून-पुसून व्हावे. असे असूनसुद्धा नियमित बी. एड्. व सुट्टीतील बी. एड्. यांचा दर्जा समान ठेवला आहे. हे बरोबर नाही. यावरून केंद्रसंचालक या अभ्यासक्रमाबाबत समाधानी नाहीत. तसे त्यांच्या मतावरून दिसून आले.

7. मुक्त विद्यापीठ शिक्षणक्रमाबाबत प्रयोगशाळा, ग्रंथालय, इमारत व अन्य सुविधा यासंबंधी सूचना :

केंद्रसंचालकांनी ग्रंथालयाबाबत विद्यार्थ्यांना पुरेशी पुस्तके नाहीत, अभ्यास साहित्य वेळेवर पुरविले जात नाही, पुस्तकांचा वापर नसल्याने दिलेल्या पुस्तिकेवर अवलंबून राहावे लागते, इमारत पुरेशी आहे, प्रयोगशाळा आहे पण मानसशास्त्रीय प्रयोगांचे गटवार प्रयोग घेण्यास कालखंड अपुरा आहे. यासाठी त्यांनी काही सूचना सुचविल्या आहेत.

1. कालखंड वाढवून तो चार वर्षांचा करावा. ते शक्य नसल्यास विद्यापीठात स्वतंत्र कोर्स राबवावा. तसेच जेथे बी. एड्. कॉलेज आहेत तेथेच राबवावयास द्यावा.
2. अभ्यास साहित्य वेळेवर पुरवावे.
3. पन्नास प्रतिशत पाठ केंद्रावरच व्हावेत. पाठांचे निरीक्षण शाळेतील शिक्षकांनी करू नये. तज्ज्ञ प्राध्यापकांनी करावे.
4. **मानधन देण्यासाठी विद्यापीठाचा रोखपाल यावा. निरीक्षकांनी भेटी द्याव्यात.**
5. पुरेसे प्राध्यापक नेमावेत.
6. मानधनाबाबत **प्रत्येकी** विद्यार्थ्याच्या मागे निम्मी म्हणजे रू.21,000/- च्या निम्मी, रू.10,000/- महाविद्यालय व प्राध्यापकांना द्यावी.
7. **अभ्यासक्रमाची पुनर्रचना करावी. त्याची परिणामकारकता पडताळून** पाहावी. प्रशिक्षणाकडे विद्यापीठाने काळजीपूर्वक, गांभीर्याने पाहावे. फक्त पैसा मिळविणे हा उद्देश असू नये.

या केंद्रसंचालकांचे हे मत इतर केंद्रातील केंद्रसंचालकांचे **प्रातिनिधिक** मते आहेत असे समजावयास काही हरकत नाही.

2. समन्वयक :

याच मुलाखतीबरोबर समन्वयक यांचीही मुलाखत घेतली.

1. मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम व स्वयंअध्ययन पुस्तिका :

   समन्वयकांनी अभ्यासक्रमात व्यवहारी दृष्टीकोन **नाही. अप्रगत कौशल्ये कशी** शोधून काढावयाची, कारण गुपदानावरून कौशल्यांची माहिती **होत नाही.** स्वयंअध्ययनपुस्तिका, विद्यापीठाकडून वेळेवर पोहोचत नाहीत. काही अध्ययन पुस्तिकेतील भाषा क्लिष्ट वाटते असे मत त्यांनी व्यक्त केले.

2. मुक्त विद्यापीठाकडून दिले जाणारे मानधन :

   विद्यापीठाकडून ज्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्याकडून शुल्क गोळा केले जाते, त्या प्रमाणात मानधन दिले जात नाही. त्यात तफावत आहे. त्याचबरोबर वेळापत्रकात ठराविक तासिकांना मानधन दिलेले नाही. ठराविकच तासिकांना मानधन आहे. अशा प्रकारे मानधनाबाबत समन्वयकसुद्धा समाधानी नाहीत.

3. केंद्रसंचालकांकडून सहकार्य **व कालखंड :**

   समन्वयकांना केंद्रसंचालकांकडून सहकार्य मिळते का ? याबाबत विचारले असता पुरेपुरे सहकार्य मिळते असे त्यांनी सांगितले. प्रशासकीय भाग कशा प्रकारे राबविला पाहिजे तसेच मानधन वाटप कशा प्रकारे करावे याचे मार्गदर्शन मिळते. प्रशिक्षण कालखंडात येणा-या अडचणी सोडविण्याकरिता मार्गदर्शन मिळते. म्हणजेच समन्वयक केंद्रसंचालकांच्या सहकार्याबाबत समाधानी आहेत असे आढळून आले आहे.

   समन्वयकांनीसुद्धा शिक्षणक्रमाचा कालखंड पुरेसा नाही, तो तीनऐवजी चार सत्रांचा असावा असे मत व्यक्त केले.

4. प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन :

प्रात्यक्षिक कामाच्या मूल्यमापनाबाबत विचारले असता समन्वयकांनी असमाधान व्यक्त केले. कारण प्रात्यक्षिकाचे मूल्यमापन करताना ते स्वतः विद्यार्थ्यांनी स्वतः केलेले आहे किंवा नाही, समजत नाही. विद्यार्थी दुस-याचे पाहून अहवाल लिहून काढतात, तसेच सहशालेय कार्यक्रमात सर्वच विद्यार्थी स्वतःहून सहभागी होत नाहीत. त्यामुळे त्यांना भाग घ्यायला लावून गुणदान करावे लागते. तीच बाब कार्यानुभवाबाबत आहे.

7. प्रशिक्षणार्थींच्या बी. एड्. शिक्षणक्रमाकडे पाहण्याचा दृष्टीकोन :

प्रशिक्षणार्थींच्या बाबत विचारले असता त्यांनी परखड शब्दात सांगितले की,

1. प्रशिक्षणार्थींची अभ्यासूवृत्ती कमी असते.
2. अभ्यासक्रम कसातरी पूर्ण करणे एवढाच हेतू असतो.
3. केवळ स्केल, बढती यासाठी हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या मागे प्रशिक्षणार्थी असतात. **नोकरी** आहे. फक्त हा शिक्षणक्रम **कसातरी पूर्ण करणे एवढाच दृष्टीकोन आढळून येतो.**

   नियम, शिस्त व वेळेत काम पूर्ण करण्याची प्रवृत्ती या बाबी त्यांना जाचक वाटतात. विद्यार्थ्यांच्या वर्तनात स्वच्छंदीपणा आढळून येतो. काम करणे कमीपणाचे वाटते.

अशा प्रकारे प्रशिक्षणार्थींच्या बाबतीत समन्वयकांचे मत आढळून आले.

8. समंत्रणाची परिणामकारकता :

समंत्रणाबाबत समन्वयकांना विचारले असता, प्रशिक्षणार्थी समंत्रणात सहभागी होत नाहीत. कारण पुस्तिकांचे, संदर्भग्रंथांचे वाचनच करत नाहीत. म्हणून त्याचे त्यांना सखोल ज्ञान नसते. वाचनासाठी वेळ नसतो. फक्त उतरवून काढण्यची वृत्ती आढळते. नवीन परिसर, नवीन वातावरण असल्याने व तज्ज्ञ प्राध्यापक असल्याने प्रशिक्षणार्थींवर दबाव येतो म्हणून समंत्रणात सहभागी होत नाहीत.

9. समन्वयकांना मुक्त विद्यापीठाकडून होणारे मार्गदर्शन :

याबाबत विचारले असता विद्यापीठाच्या निरीक्षकांनी वेळोवेळी केंद्राला भेटी द्याव्यात. कधीही विद्यापीठाचे लोक भेटी देत नाहीत.

मानधन वाटपासाठी निरीक्षक पाठवावेत. नुसते आदेश न देता वेळोवेळी येवून अडचणींचे निराकरण करावे. पुस्तिकांचे वाटप वेळेत होत नाही. ते वेळेत करावे म्हणजे अडचणी निर्माण होणार नाहीत. महाविद्यालयातील काही ठराविक लोकांना बोलावनू मार्गदर्शन केले जाते. अशा प्रकारे समन्वयक होणा-या मार्गदर्शनाबाबत असमाधानी दिसून आले.

3. प्रशिक्षणार्थी :

प्रशिक्षणार्थींना प्रश्नावली पाठवून बी. एड्. अभ्यासक्रमाबाबतची त्यांची मते, अडचणी, असलेला कालखंड, पुस्तिकांच्याबाबत त्यांची मते जाणून घेतली. त्याचबरोबर पंचवीस प्रतिशत प्रशिक्षणार्थींच्या मुलाखती घेतल्या. मुलाखतीमध्ये त्यांचे अनुभव, मते मोकळेपणाने स्पष्ट केली.

1. शिक्षणक्रमातील अडचणी :

बी. एड्. शिक्षणक्रम सुट्टीत असल्याने सुट्टी मिळत नाही. कौटुंबिक अडचणींना तोंड द्यावे लागते. अभ्यास करण्याची सवय मोडलेली असते. त्यामुळे कंटाळवाणे वाटते. अभ्यासास घरी निवांत जागा मिळत नाही. या सर्वांमुळे शाळेतील कामकाजावर परिणाम होतो. तसेच शाळेतील कामकाजामुळे अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही. इत्यादी अडचणींना तोंड द्यावे लागते.

2. स्वयंअभ्यासपुस्तिका व संदर्भग्रंथ :

स्वयंअध्ययनपुस्तिका व संदर्भग्रंथ दिलेले आहेत. पण ते वाचावयास वेळ मिळत नाही. काही वेळा संदर्भग्रंथ उपलब्ध होत नाहीत. तसेच काही अध्ययनपुस्तिकेतील भाषा क्लिष्ट आहे. समजण्यास अवघड वाटते. अशा प्रकारची मते व्यक्त केली. संदर्भग्रंथ वेळेत उपलब्ध व्हावते असेही त्यांनी सुचविले.

3. समंत्रणातील सहभाग :

समंत्रणात सहभागी होत नाही. संदर्भग्रंथ वाचावयास वेळ नसतो व अध्ययनपुस्तिकांचा पण अभ्यास न केल्याने विषयाचे सखोल ज्ञान नसते. त्यामुळे दबाव येतो. मानसिक दडपण येते. वातावरण नवीन व तज्ज्ञ प्राध्यापक असल्याने भीति वाटते. म्हणून समंत्रणात सहभागी होत नाहीत असे दिसून येते.

4. अहवाल लेखनासाठी पुरेसा कालावधी मिळतो का ?

अहवाल लेखनासंबंधी विचारले असता केंद्राकडून पुरेसा कालावधी मिळतो पण अहवाल लिहिण्याबाबत उदासीन वाटले. एकमेकांचे पाहून उतरवून काढण्याकडे कल दिसून आला.

5. केंद्रावरती प्रत्येक प्रयोगासाठी स्वतंत्र तासिका होती. त्याप्रमाणे प्राध्यापकांनी प्रयोग पूर्ण करून घेतले आहेत. यावरून मानसशास्त्रीय प्रयोगाबाबतचा बहुसंख्य विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन स्पष्ट होत नाही.

6. सरावपाठांचे दिग्दर्शन महाविद्यालयात होते. हे पाठ आदर्श असतात का ?

होय. प्राध्यापक सरावपाठांचे दिग्दर्शन करतात व मोकळेपणाने त्याची चर्चा होते. पण स्वतःच्या शाळेत त्यांना पाठ घेताना वेळ अपुरा पडतो. पर्यवेक्षणाची सोय नसते. तर काहींना भीति वाटते असे सांगितले. शाळेत साहित्य पुरेसे नसते. म्हणून शाळेत पाठासाठी पुरेसे साहित्य असले पाहिजे. तयारी केल्यास भीति कमी होईल. असे मत व्यक्त केले.

7. ऐच्छिक विषय कोणते निवडले ? शैक्षणिक तंत्रविज्ञान हा विषय का निवडला नाही ?

शैक्षणिक तंत्रविज्ञान हा विषय कठीण वाटतो. त्याचे महत्व समजले नसल्याचे प्रशिक्षणार्थी म्हणाले. शैक्षणिक तंत्रविज्ञान या विषयाबाबतची भीति कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे. तसेच लोकसंख्या शिक्षण विषयाची सक्ती केली असे काही प्रशिक्षणार्थींचे मत होते. विषयाची सक्ती करू नये.

8. अभिरूप : अध्यापन पाठ घेताना कोणत्या कोणत्या अडचणी वाटतात ?

विद्यार्थ्यांनी सांगितले, वातावरणाचा म्हणजे वर्गसदृश्य परिस्थिती निर्माण करणे, सहाध्यायांना विद्यार्थी समजणे इत्यादी अडचणी वाटल्या. त्यामुळे पाठ घेताना दडपण, भीति वाटत होती, असे सांगितले. या अभिनव उपक्रमामध्ये त्यांना सहभागी होताना अवघड वाटले. प्रश्न दिला त्यांना संकोच वाटत होता. या अध्यापनाच्या अहवालासाठी पुरेसा कालावधी आहे असे काही प्रशिक्षणार्थी म्हणाले तर कालावधी अपुरा वाटतो अशी खंत काही प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केली आहे.

9. कार्यानुभवाच्या प्रात्यक्षिकाबाबत तुमचे मत काय ?

कार्यानुभव प्रात्यक्षिक शिक्षणाची व्यावसायिकता वाढविणारी असून ती रोजच्या जीवनात उपयोगी आहे. तो एक जीवनाभिमुख अभ्यासक्रम आहे. आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. ' खडू तयार करणे ' सारख्या प्रात्यक्षिकातून शाळेला आर्थिक मदत मिळू शकेल. इतर शाळांना खडू विकून अधिक आर्थिक फायदा होईल. वर्गसजावटीमधून शाळेची सजावट होईल. ' सुंदर शाळा ' स्वप्न साकार होण्यास मदत होते. ' शैक्षणिक साधने ' यामधून शैक्षणिक साधनांची निर्मिती होते व जी ती अद्ययावत साधने म्हणून वापरता येतील. म्हणून कार्यानुभवास जास्त प्राधान्य देवून त्यासाठी जास्त वेळ द्यावा व त्यास अधिक गुणांची जोड द्यावी असे मत व्यक्त केले.